नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

र्भी साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

कै. बाळाजी दप्तरी स्मृती
विदर्भ संशोधन
वि. सा. संघ, नागपूर

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

या अंकांत

न्यायदर्शन	–श्रीधर भास्कर वर्णेकर
साहित्यसाधना (लघुनिबंध)	–अ. तु. वाळके
गडकऱ्यांच्या नाटकांतील विनोद	–म. ना. लोही
ग्रंथसमालोचन	
संघवार्ता	
विदर्भ साहित्य संघाचें इ. स. १९५६–५७ चें कार्यवृत्त	

विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विबुध सारस्वतीजन्मभूः

वर्ष १२ संपादक : मे १९५७
अंक २ पां. कृ. सावळापूरकर किंमत आठ आणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक :

पां. कृ. सावळापूरकर

संपादक मंडळ :

कृ. व्यं. पेशकार
मा. ल. व्यवहारे
व. कृ. वऱ्हाडपांडे
प्र. दे. कोलते
रा. ना. घाटोळे
भा. श्री. परांजपे
तु. ना. काटकर

वर्ष १२ वें अंक २

मे १९५७

संपादकीय

महर्षि अण्णासाहेब कर्वे

गेल्या महिन्यांत महर्षि अण्णासाहेब कर्वे यांनी आपल्या वयाच्या शंभराव्या वर्षांत पदार्पण केलें याबद्दल आम्ही त्यांना अभिवादन करतो. आयुष्यभर सतत विधायक कार्य करीत राहून, निष्ठा, त्याग, कर्तृत्व आणि चारित्र्य याचा मूर्तिमान आदर्श ज्यांनी उभा केला अशा दुर्मिळ महापुरुषांत महर्षि कर्वे यांची गणना होते. त्यांचे सद्गुण उत्तरोत्तरच्या पिढ्यांत संक्रमित होत जावो हीच इच्छा.

स्वातंत्र्य समर

अठराशे सत्तावनच्या स्वातंत्र्य समरास चालू मे महिन्यांत शंभर वर्षे पूर्ण होतात, यास्तव त्याची शताब्दी भारतभर साजरी होणार आहे ही सुदैवाची गोष्ट आहे. मेच्या दहा तारखेस या समरास प्रारंभ झाला म्हणून तोच दिवस शताब्दीला योग्य आहे असें अनेकांचें मत आहे, या उलट आपण शंभरावें वर्ष साजरें करीत आहोंत, त्या अर्थी या वर्षांत तो उत्सव केव्हाहि पार पाडावयाला हरकत नाही. म्हणून १५ ऑगष्ट या दिवशींच शताब्दी साजरी करावी त्यायोगें नवा स्वातंत्र्यदिन व जुन्या स्वातंत्र्य समराची स्मृति यांचा संयोग घडून येईल व अशा रीतीने स्वातंत्र्योद्योगाच्या आद्यन्ताचीं दोन टोकें सांधलीं जातील असे सरकारी पद्धतीने विचार करणारांचें म्हणणे आहे. कांही असलें तरी अठराशे सत्तावनची शताब्दी साजरी करण्याच्या बाबतींत कांही कोणाचें दुमत नाही.

१८५७ चे युद्ध हें एक शिपायांचें बंड होतें. अशी शिकवण इंग्रजांनी आम्हांला दिली व ती तीन चार पिढ्या दृढमूल झाली. पुढे १९०७ मध्ये स्वातंत्र्यवीर सावरकरांनी हें क्रांतियुद्धच होतें हा पक्ष पुराव्यानिशीं सिद्ध केला व तो आता सुप्रतिष्ठित झाला आहे. परंतु अजूनहि अठराशें सत्तावनचें युद्ध हें स्वातंत्र्य-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

युद्ध नव्हतें, ती पदच्युत व्यक्तींनी आपली पूर्व-स्थानें मिळविण्यासाठी केलेली धडपड होती, तो सरंजामशाहीचा देखावा होता, आधुनिक लोकशाहीची आणि शुद्ध राष्ट्रीयत्वाची कल्पनाहि त्या लोकांना नव्हती. त्यांच्यापाशीं देशभावनेपेक्षा धर्मभावनाच प्रबल होती, असें प्रतिपादन क्वचित् ऐकूं येते. अठराशे सत्तावनचें स्वातंत्र्ययुद्धत्व नाकारणारे जुने पंडित हे इंग्रजांचे 'केले' होते. पण आजचे सत्तावनी विरोधक हे नव्या पुरोगामी मताचे ताबेदार आहेत ! जुन्या लोकांचें प्रतिपादन आपण समजूं शकतों, पण नव्या लोकांनी आजहि वेगळ्या भूमिकेवरून पण तेंच प्रतिपादन करीत राहावें हें नवल आहे. या संबंधी विस्तृत चर्चा करण्याचा आमचा मानस नाही. तथापि एक दोन गोष्टीचा फक्त उल्लेख करतो. एकतर आजच्या लोकशाहीच्या आणि राष्ट्रीयत्वाच्या निकषावरून शंभरवर्षापूर्वीच्या घटनांचें परीक्षण करणें अयोग्य आहे. शंभरवर्षांपूर्वी या देशांत जी स्वातंत्र्याची कल्पना प्रचलित होती त्या दृष्टीनेच हें मूल्यमापन झालें पाहिजे. दुसरें असें की इंग्रजांमुळे आम्ही परतंत्र झालों हें जर खरें तर इंग्रजांपूर्वी आम्ही स्वतंत्र होतों असेंच मानलें पाहिजे. अर्थात् इंग्रजांना घालवून देऊन इंग्रजपूर्वकालीन स्थिति जशीची तशी आणण्याचा प्रयत्न करणें म्हणजे पारतंत्र्य काढून टाकून स्वातंत्र्याची पुनः प्रतिष्ठापना करण्याचा प्रयत्न करणें होय. या दृष्टीने सत्तावनी युद्ध हें स्वातंत्र्यसमरच मानलें पाहिजे.

मराठीमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर आणि ना. के. बेहेरे यांचे ग्रंथ या विषयावर उपलब्ध आहेत. तसेंच कै. चिं. वि. वैद्य यांनी प्रकाशित केलेला गोडसे भटजीचा प्रवासहि सत्तावनच्या क्रांतियुद्धाचें आंशिक दर्शन करून देतो. कै. रा. ब. पारसनीस यांनी लिहिलेलें राणी लक्ष्मीबाईचें चरित्र हाहि ग्रंथ चांगला आहे. पण इंग्रजबहाद्दरांना दोष देण्याची चरित्रकाराची हिंमत झाली नसल्यामुळे सत्य आणि धोरण यांचा तारेवरचा नाच त्यांना करावा लागला. शिवाय या शताब्दीच्या निमित्ताने अनेक नियतकालिकांचे विशेषांक व कांही नवे ग्रंथ याचा लाभ आपणाला होईल. मराठींतील या विषयावरील ही ग्रंथसंख्या अगदीच अल्प आहे व नव्या लेखकास या विषयावर शोध करण्यास व लेखन करण्यास पुष्कळच वाव आहे हें यावरून सहज दिसून येईल.

अठराशे सत्तावनच्या क्रांतियुद्धांतील लहान-मोठ्या सर्व हुतात्म्यांना आम्ही आपली श्रद्धांजलि अर्पण करतों.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

न्यायदर्शन

श्रीधर भास्कर वर्णेकर

चार वेद, सहा वेदाङ्गें व सहा दर्शनें हीं भारतीय संस्कृतिरूपी देवतेचीं जणूं ज्ञानेन्द्रियेंच होत. वेद, वेदांगे व दर्शनें यांच्या साहाय्याने भारतीयांनी अनादिकाला-पासून सृष्टीच्या गूढ स्वरूपाचें अन्तर्बाह्य ज्ञान प्राप्त करून तें निरनिराळया संस्कृत ग्रन्थांतून शतकानुशतकां-पासून संचित करून ठेवलें आहे. हें ज्ञान ऐतिहासिक दृष्टया अतिप्राचीन असलें तरी अगदी अद्ययावत् समजण्यांत येणाऱ्या सिद्धान्तांच्या तुलनेंत सुद्धा तें परिपूर्ण असल्यासारखें आहे.

षड्दर्शनांची गणना करणाऱ्या,

"**गौतमस्य कणादस्य कपिलस्य पतञ्जलेः ।**
व्यासस्य जैमिनेश्चापि दर्शनानि षडेव हि ॥

या प्रसिद्ध श्लोकांत गौतमाच्या न्यायदर्शनाचा क्रम प्रथम लावण्यांत आला आहे. भारतीय दर्शनांच्या प्रभावळींत न्यायदर्शनाला प्रस्तुत श्लोककाराने अग्रस्थान दिलें याचें कारण न्यायदर्शन हें सर्व शास्त्रांचें मूळ आहे. ज्ञानाची सत्यासत्यता दाखविणारें शास्त्र म्हणजे न्यायशास्त्र, अशी न्यायशास्त्राची थोरवी असल्यामुळे न्यायशास्त्राच्या अध्ययनावाचून इतर कोणत्याहि शास्त्राचें अध्ययन कितीहि केलें तरी तें व्यर्थ समजलें पाहिजे. वात्स्यायनाच्या न्यायसूत्रभाष्य नामक ग्रंथाच्या आरंभीं न्यायशास्त्राचें महत्व पुढीलप्रमाणें वर्णन केलेलें आहे.

"**प्रदीपः सर्वविद्यानाम् उपायः सर्वकर्मणाम् ।**
आश्रयः सर्वधर्माणां विद्योद्देशे प्रकीर्तिता ॥

न्यायशास्त्र म्हणजे सर्व विद्यांना प्रकाशित करणारा प्रदीप, सर्व कर्मांचा उपाय व सर्व धर्मांचें आश्रयस्थान आहे. यापेक्षा अधिक उत्कट रीतीने या शास्त्राचें महत्त्व वर्णन करणें अशक्य आहे. ज्ञानेश्वरमहाराजांनी आपल्या गणेशरूपकांत या न्याय किंवा तर्कशास्त्रास प्रत्यक्ष ज्ञानदेवताच्या हातांतील तीक्ष्ण परशूची उपमा दिली आहे. सत्यज्ञानाचा लोप करणारें असत्य, मिथ्या-ज्ञान किंवा भ्रमपटल याचें उच्छेदन करणाऱ्या या शास्त्रास ज्ञानेश्वरमहाराजांनी दिलेली परशूची उपमा सुद्धा अगदी यथार्थ आहे.

सत्य काय आणि असत्य काय याच्या संबंधीचा निर्णय देणाऱ्या निश्चित प्रमाणांचा विचार हा न्याय-शास्त्राचा प्रमुख विषय आहे हें, "**प्रमाणैरर्थपरीक्षणं न्यायः**" या व्याख्येवरून उघड आहे. या व्याख्येनुसार या न्यायशास्त्रास **प्रमाणशास्त्र** किंवा **प्रमाणविद्या** हें नांव क्वचित् दिलेलें आढळून येते.

प्राचीन परम्परा

न्यायशास्त्राचे प्रवर्तक **गौतम ऋषि** मानण्यांत आले आहेत. ख्रिस्तपूर्व २ऱ्या शतकांत गौतमाच्या न्यायसूत्रांची रचना झाली असावी. असें इतिहासज्ञाचें मत आहे. न्यायशास्त्रावरील उपलब्ध असलेल्या सर्व ग्रंथांमध्ये गौतमाच्या न्यायसूत्रांचा क्रमांक पहिला आहे. गौतम हे **अक्षपाद** या नांवानेहि प्रसिद्ध आहेत. गौतमाच्या न्यायसूत्रांवर वात्स्यायनाने **न्यायसूत्रभाष्य** नांवाचा प्राख्यात भाष्यग्रन्थ लिहिला. त्याच योग्यतेचा दुसरा ग्रन्थ म्हणजे उद्योतकराचें **न्यायवार्तिक** ! न्यायवार्तिकावर वाचस्पतिमिश्र यांनी **न्यायवार्तिक-तात्पर्य** नामक टीका लिहिली. याव्यतिरिक्त **न्यायसूचिनिवन्ध** नांवाचा दुसराहि ग्रन्थ श्रीवाच-स्पतिमिश्र यांनी लिहिलेला आहे. तात्पर्य प्राचीन काळीं न्यायशास्त्राचें सर्वंकष विवेचन करणारे अत्यंत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उत्कृष्ट असे जे सरासरी २५ ग्रन्थ निर्माण झाले, त्या सर्वांचा मूलाधार म्हणजे गोतमाचीं न्यायसूत्रें होत.

तथापि गोतमापूर्वी न्यायशास्त्र किंवा तर्कशास्त्र अस्तित्वांतच नव्हतें असें म्हणतां येणार नाही. छान्दोग्य उपनिषदांत अनेकशास्त्रांच्या नामावलींत **'वाकोवाक्यम्'** नांवाच्या एका शास्त्राचा निर्देश करण्यांत आला आहे. वाकोवाक्यम् या शब्दाचा अर्थ श्रीमत् शंकराचार्यांनी तर्कशास्त्र म्हणजे न्यायशास्त्र असा दिलेला आहे. 'वाकोवाक्यम्' या शब्दाव्यतिरिक्त **'आन्वीक्षिकी'** हा शब्द न्यायशास्त्र या अर्थी अनेक प्राचीन ग्रंथांत वापरलेला आहे. कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रांत आन्वीक्षिकी, त्रयी, वार्ता व दण्डनीति या चारहि विद्यांचें अध्ययन राजपुरुषासाठी आवश्यक म्हणून सांगितलें असलें तरी त्यांतहि आन्वीक्षिकीचें म्हणजे न्यायशास्त्राचें महत्त्व विशेष प्रकारें वर्णन केलेलें आहे. कौटिल्य म्हणतात:—

> **"बलावले चैतासां हेतुभिरन्वीक्षमाणा आन्वीक्षिकी लोकस्योपकरोति, व्यसने अभ्युदये च बुद्धिम् अवस्थापयति, प्रज्ञावाक्यवैशारद्यं च करोति."**

याचा अर्थ त्रयी म्हणजे तीन वेद, वार्ता म्हणजे कृषि, पशुपालन व वाणिज्य अर्थात् अर्थशास्त्र व दण्डनीती म्हणजे लोकव्यवहारशास्त्र यांच्या बलाबलाची परीक्षा करणारी विद्या जी आन्वीक्षिकी, तिच्या योगाने अभ्युदयकालीं व संकटकालीं बुद्धि स्थिर राहते. विचार, उच्चार व आचार यात चतुरता येते म्हणून आन्वीक्षिकी ही राजास अत्यंत उपकारक अशी विद्या आहे अशा प्रकारें न्यायशास्त्राचें महात्म्य वर्णन करण्याच्या संदर्भात कौटिल्याने आन्वीक्षिकी या शब्दाचा उपयोग केला आहे.

विकासक्रम

भारतीय न्यायशास्त्राचा विकासक्रम मोठा मनोरंजक आहे. ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकांत गोतमांची न्यायसूत्रें प्रकाशांत आल्यावर सरासरी ७ शें वर्षांनी म्हणजे ख्रिस्तोत्तर ४ थ्या शतकांत त्यावर पहिलें भाष्य लिहिलें गेलें. वात्स्यायनाचें न्यायसूत्रभाष्य हाच तो भाष्य ग्रंथ ! त्यानंतर पुन: तीनशें वर्षेपर्यंत या विषयावर महत्त्वाचा ग्रंथ लिहिल्याचें दिसत नाही. इ. स. ७ व्या शतकांत उद्योतकराचें न्यायवार्तिक प्रकाशांत आलें. मध्यंतरींच्या काळांत बौद्ध व जैन सम्प्रदायांच्या विद्वानांनी न्यायशास्त्रावर जे आक्षेप घेतले त्यांचें खंडन करण्याच्या उद्देशाने उद्योतकराचार्यांनी न्यायसूत्रें व न्यायसूत्रभाष्य या दोन प्राचीन ग्रंथांच्या आधारें आपलें वार्तिक लिहिलें.

त्यानंतर २ शें वर्षें पर्यन्त न्यायशास्त्रविषयक ग्रंथ लिहिला गेल्याचें दिसत नाही. इ. सनाच्या ९ व्या शतकांत उदयास आलेल्या व **'षड्दर्शन व्याख्याता'** या अलभ्य उपाधीने विभूषित झालेल्या **वाचस्पति मिश्र** नामक महापण्डिताने उद्योतकराच्या न्यायवार्तिकावर तात्पर्यटीका नामक महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहून फार मोलाची भर घातली. वाचस्पति मिश्रांच्या टीका व भाष्य ग्रंथांनी एकूण भारतीय तत्त्व ज्ञानविषयक वाङ्मयांत फारच मोलाची भर टाकलेली आहे; तथापि न्यायशास्त्राच्या संबंधांत त्यांची कामगिरी फारच महत्त्वाची आहे. 'न्यायसूचिनिबन्ध' नांवाचा ग्रंथ लिहून वाचस्पति मिश्रांनी मूळ गोतमसूत्रांचें शुद्धीकरण व संस्करण केलें. न्यायसूचिनिबन्धाच्या शेवटीं, 'कुनिबन्धरूपी चिखलांत रुतलेलीं न्यायसूत्रें मी वर काढीत आहें.' असें उद्गार त्यांनी काढले आहेत. त्यावरून वाचस्पति मिश्रांनी विलयाच्या मार्गास लागलेल्या या गहन शास्त्राचा जणुं उद्धारच केला.

त्यानंतर १० व्या शतकांत जयन्त भट्टांनी **न्यायमंजरी** व उदयनाचार्यांनी **न्यायकुसुमांजलि व बौद्धधिक्कार** हे ग्रंथ लिहून न्यायविरोधी मतांचें विशेषत: जैन व बौद्ध मतांचें जणुं निर्मूलन केलें. बौद्ध सम्प्रदायाचें भारतांत निर्मूलन करणाऱ्या अनेक आचार्यांमध्ये **जयन्तभट्ट** व **उदयनाचार्य** या दोन नैयायिकांचें स्थान फार महत्त्वाचें आहे. निरीश्वरवादाचें खण्डन व एकेश्वरवादाचें समर्थन करण्याचें कार्य १० व्या शतकांत उदयनाचार्यांनी कठोर तर्कांच्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आश्रयाने केल्यामुळे भारताच्या धार्मिक जीवन प्रणालीला निराळीच दिशा लागलेली दिसून येते.

नव्य न्यायाचा उदय

उदयनाचार्यानंतर **वर्धमान, भासर्वज्ञ, रुचिदत्त, वल्लभाचार्य** इत्यादि नैयायिक उदयास आले. पण त्यांनी शास्त्रांत फारशी मोलाची भर टाकलेली नाही. १२ व्या शतकांत मात्र न्यायशास्त्रांत फार महत्त्वाची क्रान्ति झाली. १२ व्या शतकापर्यन्त सूत्र-भाष्य पद्धतीने न्यायशास्त्राचें अध्ययन होत होतें. पण १२ व्या शतकांत उदयास आलेल्या **गंगेशोपाध्याय** नामक मैथिलपंडिताने **तत्त्वचिन्तामणी** नांवाचा ४ खण्डात्मक ग्रंथ लिहून ही प्राचीन परम्परा विलयास नेली. न्यायशास्त्रांत प्रमाणभूत मानण्यांत आलेल्या **प्रत्यक्ष, अनुमान, उपमान,** व **शब्द** या प्रमाणांवर प्रत्येकी एकेक खण्ड तत्त्वचिन्तामणीमध्ये आहे. विशेष म्हणजे गौतमाच्या न्यायसूत्रापासून आत्मा, पुनर्जन्म, मोक्ष यासारख्या आध्यात्मिक विषयांचा ऊहापोह करण्याची जी पद्धति न्यायशास्त्रांत रूढ झाली होती ती गंगेशोपाध्यायाने बंद पाडली, त्यामुळे न्यायशास्त्राचें आध्यात्मिक शास्त्रापासून विभक्त स्वरूप स्पष्ट झालें. या तत्त्वचिन्तामणीचा न्यायशास्त्रावर अभूतपूर्व प्रभाव पडला. त्याच्या प्रभावामुळे प्राचीन सूत्र–भाष्याचें म्हणजे प्राचीन न्यायाचें अध्ययन बंद पडलें. व नव्य न्यायशास्त्राचा उदय झाला. बंगाल, मद्रास, महाराष्ट्र काश्मीर इत्यादि दूरदूरच्या प्रांतांतील नैयायिकांत या ग्रंथाचा प्रचार झाला. १६ व्या शतकांत **रघुनाथ-तार्किक-शिरोमणि,** नांवाच्या वंगदेशीय नैयायिकाने तत्त्वचिन्तामणीच्या अनुमानखण्ड व शब्दखण्ड या दोन खंडावर **दीधिति** नामक विख्यात टीकाग्रंथ लिहिला **मथुरानाथ** पंडिताने तत्त्वचिन्तामणीच्या चारहि खंडांवर व रघुनाथ शिरोमणीच्या दोन टीकाखण्डांवर स्वतंत्र टीका लिहिल्या. १७ व्या शतकांत **जगदीश** व **गदाधर** यांनी तत्त्वचिन्तामणीच्या अनुमानखण्डावरील दीधितीवर टीका लिहिल्या. नैयायिक परम्परेंतील शेवटचा महान् पण्डित म्हणजे **गदाधर** ! या गदाधर भट्टाने नैयायिकांच्या विषयप्रतिपादनास इतकें क्लिष्ट व किचकट वळण लावलें की त्यामुळे मूळ तत्त्वचिन्तामणि व त्यावरील दीधितीचें अध्ययन बंद पडलें.

१७ व्या शतकांत न्यायशास्त्राला इतकें क्लिष्ट वळण लागत असतांना या शास्त्राची बालबोध पद्धतीने मांडणी करण्याचा अभिनन्दनीय उपक्रम **विश्वनाथ न्यायपंचानन** व **अन्नंभट्ट** या दोन विद्वानांनी सुरू केला होता. विश्वनाथ न्यायपंचाननाचा **भाषापरिच्छेद** व अन्नंभट्टाचा **तर्कसंग्रह** हे दोन संक्षिप्त ग्रंथ तर्कशास्त्राच्या सर्वंकप परिचयासाठी अत्यंत उपयुक्त आहेत.

तात्पर्य गंगेशोपाध्यायापासून प्राचीन न्यायाची परम्परा खण्डित होऊन नव्यन्याय उदयास आला. या नव्यन्यायास आधारभूत असलेला तत्त्वचिन्तामणि सुमारें ३०० पानांचा असला तरी त्यावर लिहिल्या गेलेल्या **भाष्यात्मक ग्रंथांची पृष्ठसंख्या १० लक्षापेक्षा अधिक भरेल** असें म्हणतात.

इ. सनापूर्वी चवथ्या शतकापासून इ. सनाच्या १७ व्या शतकापर्यन्तच्या म्हणजे सरासरी २ हजार वर्षांच्या काळांत न्यायशास्त्रावर लिहिण्यांत आलेल्या प्रमुख संस्कृत ग्रंथांची संख्या जेमतेम २०-२५ असली तरी त्यांतील विचारांची सूक्ष्मता व सखोलता विलक्षण आश्चर्यकारक आहे. भारतीय पण्डितांच्या विचारांची व्याप्ति रामायण व विशेषतः महाभारतावरून लक्षांत येते; पण त्यांची खोली न्यायशास्त्रावरील ग्रंथांच्या द्वाराच लक्षांत येईल.

न्यायशास्त्राचें ध्येय

"ऋते ज्ञानान्न मुक्तिः" हा भारतीय दार्शनिकांचा सर्वमान्य मौलिक सिद्धान्त आहे. पण ज्ञेयाच्या संबंधांत मात्र विविध दार्शनिकांत मतभेद आहे, ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. न्यायदर्शनाच्या मतानुसार, **प्रमाण, प्रमेय, संशय, प्रयोजन, दृष्टान्त, सिद्धान्त, अवयव, तर्क, निर्णय, वाद, जल्प, वितंडा, हेत्वाभास, छल, जाति** व **निग्रहस्थान** या १६ पदार्थांच्या यथार्थ ज्ञानाने निःश्रेयसाची

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्राप्ति होते. "ऋते ज्ञानान्न मुक्तिः" हा सिद्धान्त सर्वच दार्शनिकांनी शिरोधार्य मानला असला तरी शुद्ध ज्ञानप्राप्तीचीं साधनें कोणतीं याचा सूक्ष्म विचार न्यायशास्त्राने विशेष प्रकारें केला आहे. त्या दृष्टीने न्यायशास्त्राने केलेला प्रमाण व हेत्वाभास यांचा विवेक इतर शास्त्रांनी देखील अनुसरलेला आहे.

प्रमेय

प्रमाणप्रमेय इत्यादि १६ पदार्थांपैकी दुसरा पदार्थ जो प्रमेय त्यामध्ये, आत्मा, शरीर, इंद्रियें, अर्थ, बुद्धि, मन, प्रवृत्ति, दोष, प्रेत्यभाव (म्हणजे पुनर्जन्म) फल, दुःख व अपवर्ग (मोक्ष) या १२ आध्यात्मिक विषयांचा नैयायिकांच्या दृष्टिकोणांतून विचार केलेला आहे. नैयायिकांच्या मतें आत्मा हा विभु, नित्य व प्रतिशरीर विभिन्न आहे. कारण प्रत्येकाचे सुखदुःख विभिन्न असतें. प्रमेयविवेचन हें नैयायिकांचें वैशिष्ट्य नाही.

वादविद्येचें विवेचन

उरलेल्या १५ पदार्थांपैकी संशय, प्रयोजन, दृष्टांत सिद्धान्त इत्यादि १४ विषय वादविद्येच्या दृष्टीने फार महत्वाचे आहेत. सत्यासत्याच्या निर्णयासाठी दुसऱ्याशीं वाद करीत असतांना त्याच्या प्रतिपादनांतील दोष कसे हुडकून काढावेत याच्या मार्मिक सूचना या १४ पदार्थांच्या विवेचनांत केलेल्या असतात. वादविद्येच्या अंगोपांगांचें नैयायिकांनी केलेलें विवेचन मोठें उद्बोधक व मनोरंजक आहे.

उदाहरणार्थ **संशय** हा समानधर्मदर्शनज, विप्रतिपत्तिज व साधारणधर्मज असा तीन प्रकारचा आहे.

प्रयोजन हें सुखप्राप्ति व दुःखहानि असें दोन प्रकारचें आहे.

दृष्टान्त हा साधर्म्यमूलक व वैधर्म्यमूलक असा दोन प्रकारचा असतो.

सिद्धान्त हा सर्वतन्त्र, प्रतितन्त्र, अधिकरण व अभ्युपगम असा चार प्रकारचा असतो.

अनुमान वाक्याचे अवयव पांच प्रकारचे असतात. हे पांच अवयव म्हणजे **प्रतिज्ञा, हेतु, उदाहरण, उपनय** व **निगमन!** पर्वतावरील प्रत्यक्ष न दिसणाऱ्या अग्नीचें अस्तित्व अनुमानाने सिद्ध करावयाचें असल्यास तें पंचावयवी वाक्याच्या द्वारा सिद्ध करावें लागतें. जसें, पर्वतोऽयं वह्निमान् अशा प्रकारच्या साध्य प्रतिपादन करणाऱ्या वाक्याला प्रतिज्ञा म्हणतात. पण केवळ प्रतिज्ञावाक्याने साध्य सिद्ध होत नाही, प्रतिज्ञावाक्य पर्वतावर काय असावें या संबंधीच्या जिज्ञासेला प्रत्युत्तर देतें, पण तेवढयाने तें वाक्य. ऐकणाऱ्याचें समाधान किंवा भ्रमनिरास होत नाही. म्हणून प्रतिज्ञावाक्यानंतर लिंगप्रतिपादक हेतुवाक्य सांगावें लागतें. प्रस्तुत उदाहरणांत "पर्वतोऽयं वह्निमान्" या प्रतिज्ञावाक्यानंतर "धूमवत्वात्" त्यावर धूर आहे म्हणून, अशा प्रकारचें हेतुवाक्य सांगावें लागतें.

पण पर्वत धूमवान् आहे म्हणून तो अग्निमान् आहे. एवढयावरच ऐकणाऱ्याचें सम्पूर्ण समाधान होऊं शकत नसल्याने धूर आणि अग्नि यांचें नित्य साहचर्य सांगून तें साहचर्य सिद्ध करणारें प्रसिद्ध उदाहरण देणें आवश्यक असतें. त्याला दृष्टान्त वाक्य असें म्हणतात. प्रस्तुत उदाहरणांत 'यो यो धूमवान्, स स वह्निमान्, यथा महानसः" जो जो धुराने युक्त असतो तो तो अग्नीने युक्त असतो. उदाहरणार्थ स्वयंपाकघर !

अशा प्रकारें प्रतिज्ञा, हेतु व दृष्टांत सांगितल्यावर पक्षाच्या ठिकाणीं लिङ्गोपसंहार व साध्योपसंहार करणारीं वाक्यें सांगून समाधान करण्यांत येतें. अग्नीशीं नित्य साहचर्य असणारा धूर या पर्वतावर आहे म्हणून हा पर्वत अग्निमान आहे. "वह्निव्याप्य धूमांश्च अयं पर्वतः" "तस्मात् अयं पर्वतः वह्निमान्" अशा प्रकारच्या उपसंहारात्मक वाक्यांना अनुक्रमें उपनय व निगमन असें म्हणतात.

अनुमान वाक्याचें पंचावयवित्व हें भारतीय तर्कपद्धतीचें वैशिष्ट्य आहे, पाश्चात्य तर्कपद्धतींत अनुमान वाक्याचे अवयव तीनच असतात. ज्यावेळीं एखाद्या पदार्थासंबंधीं साधक व बाधक अशीं दोन्ही प्रकारचीं प्रमाणें उपलब्ध नसल्यामुळे संदेह उत्पन्न होतो अशाच प्रसंगीं पंचावयवी अनुमान वाक्याच्या आश्रयाने साध्यसिद्धि करावी. **शशशृंगाचें किंवा वंध्यापुत्राचें**

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अस्तित्व हा अनुमानाचा विषय होत नाही किंवा स्वयंपाकघरांत अग्नि व धूर दोन्ही डोळयांना प्रत्यक्ष दिसत असतांना तेथील अग्नीचें अस्तित्व हें पर्वतावरील अग्नीच्या अस्तित्वाप्रमाणें अनुमानाचा विषय होत नाही, असें न्यायसूत्राचे भाष्यकार उदयनाचार्य यांनी **"नाऽनुपलब्धे न निर्णितेऽर्थे न्यायः प्रवर्तते किन्तु सन्दिग्धे"** या वाक्यांत स्पष्ट सांगितलें आहे.

हेत्वाभास

पंचावयवी अनुमानामध्ये दुसरें हेतुवाक्य हें फार महत्वाचें असतें. हेतुवाक्यामध्ये, **पक्षसत्त्व, सपक्षसत्त्व, विपक्षसत्त्व, असत्प्रतिपक्षत्त्व व अबाधितविषयत्व** हे पांचहि गुण असणें आवश्यक असतें. पर्वत वह्निमान् ही प्रतिज्ञा सिद्ध करण्यासाठी सांगितलेलें 'वह्निमत्वात्' हें हेतुवाक्य या पांच गुणांनी सम्पन्न आहे. पण वादाच्या भरांत अशा प्रकारचा पंचलक्षणी हेतु न देतां वायफळ वितंडवाद करणारे कुतार्किक, हेत्वाभासावर वेळ मारून नेण्याचा प्रयत्न करीत असतात. **हेत्वाभास म्हणजे हेतुप्रमाणे भासणारे पण हेतुलक्षणविरहित असणारे दुष्ट हेतु.** हेत्वाभास हे अज्ञ जनतेच्या बुद्धिभेदास कारणीभूत होतात, म्हणून त्याचें यथार्थ ज्ञान प्रत्येक सुशिक्षितास असणें अत्यंत आवश्यक आहे. भारतीय न्यायशास्त्रकारांनी या बुद्धिभेदकारी हेत्वाभासाचा फार सूक्ष्म विचार करून त्याचे, **असिद्ध, विरुद्ध, अनैकान्तिक, प्रकरणसम व कालात्ययापदिष्ट** असे पांच भेद सांगितलेले आहेत.

या पांच भेदांचे आणखी अवान्तर पोटभेद आहेत. उदारणार्थ, असिद्ध–हेत्वाभासाचे आश्रयासिद्ध, स्वरूपासिद्ध, व्याप्यत्वासिद्ध असे तीन प्रकार आहेत. अनैकान्तिक हेत्वाभासाचे साधारण व असाधारण असे दोन प्रकार आहेत. विरुद्ध, प्रकरणसम व कालात्ययापदिष्ट यांचे पोटभेद नाहीत. या पांचहि हेत्वाभासांची त्यांच्या पोटभेदांसह न्यायशास्त्राच्या ग्रन्थांत सांगितलेलीं निरनिराळीं उदाहरणें पाहिलीं म्हणजे वादयुद्धाच्या आवेशांत कशी प्रकारच्या चुका अभावितपणें होण्याचा संभव असतो, याची नीट कल्पना येते. उदाहरणार्थ, "पर्वतो वह्निमान् धूमवत्त्वात्" या प्रसिद्ध अनुमानवाक्यातील "यो यो धूमवान् स स वह्निमान्" ही व्याप्ति लक्षांत ठेवून तिच्या आधारें सरोवरावर कोठून तरी आलेला धूर पाहून "सरोवरोऽयं वह्निमान् धूमवत्वात्" अशा प्रकाचा तर्क कोणी केला तरी तो ग्राह्य मानता येत नाही. कारण या उदाहरणांत दिलेला हेतु हा सत्हेतु नसून हेत्वाभास म्हणजे असत् हेतु आहे, कारण त्यात असिद्धि नांवाचा दोष आहे. म्हणून असल्या प्रकारच्या हेतूला असिद्धि म्हणजे स्वरूपासिद्ध नांवाचा हेत्वाभास म्हणावयास हवें. व्यवहारांत हे हेत्वाभास सतत ऐकावयास मिळतात 'आमचा शेजारी फार श्रीमंत आहे. कारण त्यांचें नांव लक्ष्मीकांत व आडनांव लखपति आहे." "रामराव फार देशभक्त आहेत कारण याच्या घरावर बारा महिने तेरा काळ राष्ट्रध्वज फडफडत असतो. गोविंदराव फार विद्वान् आहेत, कारण त्यांच्या घरांत एक हजार उत्कृष्ट ग्रन्थ आहेत. नागपूर शहर फार सुन्दर आहे, कारण तेथे शुक्रवार तलाव आहे." अशा प्रकारचें सकृद्दर्शनीं तर्कयुक्त पण मुळांत तर्कशून्य वाक्यें कोठेहि ऐकावयास मिळतात.

न्यायशास्त्राच्या ग्रन्थांत हेत्वाभासांच्या विशदीकरणासाठी दिलेलीं,

"गगनारविन्दंसुरभि अरविन्दत्वात् सरोजारविन्दवत्"। 'पृथिव्यादयः चत्वारः परमाणवो नित्याः गन्धवत्वात्।' "शब्दो नित्यो द्रव्यत्वे सति अस्पर्शत्वात्"। "स श्यामो मैत्रीतनयत्वात्"। "शब्दो नित्यः कृतकत्वात्"। "शब्दो नित्यः प्रमेयत्वात्"। "भूमिर्नित्या गन्धवत्वात्"। "शब्दो अनित्यः नित्यधर्मानुपलब्धेः"। "परमाणुरनित्यः मूर्तत्वात् घटवत्"। हीं व यांसारखी उदाहरणें आणि त्यांतील दोषांसंबंधीचें विवेचन फारच मार्मिक व उद्बोधक आहे. स्वतःच्या किंवा इतराच्या प्रतिपादनांतील सदोषत्वाचें ज्ञान होण्यासाठी न्यायशास्त्रांतील हेत्वाभासांचें ज्ञान प्रत्येक सुशिक्षितास असणें अत्यंत आवश्यक आहे.

कांही शास्त्रकारांनी केवल व्यतिरेकी हेतु असलेल्या लक्षणांचें अव्याप्ति, अतिव्याप्ति व असम्भव

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हे तीन दोष सांगितलेलें आहेत, पण नैयायिकांच्या मतें त्यांचा अन्तर्भाव पंचविध हेत्वाभासामध्येच होतो.

वादयुद्धांतील पराजय

वादयुद्धांत ज्या दोषांमुळे पराजय पदरीं येतो त्यांना छल, जाति व निग्रहस्थान अशीं नांवें आहेत. वक्त्याच्या अभिप्रायाचा जाणून बुजून विपर्यास करून त्याला दोषी ठरविणें यास छल, वाच्छल किंवा शब्दच्छल अशीं नांवें आहेत. "**नवकम्बलोऽयं देवदत्तः** असें वक्त्यानें विधान केल्यास 'नव' शब्दावर श्लेष करून " न ह्यस्य कम्बलद्वयमपि सम्भाव्यते कुतो नव " याच्या जवळ दोन कांबळीं सुद्धा असणें शक्य नसतांना नव म्हणजे नऊ कांबळीं असणें कसें शक्य आहे, अशा प्रकारचा शब्दाचा विपर्यास कुतार्किक करीत असतात.

वक्त्यानें दिलेल्या दृष्टान्ताशीं भलत्याच गोष्टीचें साधर्म्य किंवा वैधर्म्य दाखवून मूळ अभिप्रायाचा विपर्यास करण्याच्या वादप्रकारास **जाति** असें नांव आहे, जाति साधर्म्यसम, वैधर्म्यसम, उत्कर्षसम, अपकर्षसम, वर्ण्यसम, अवर्ण्यसम, विकल्पसम, साध्यसम, प्राप्तिसम, अप्राप्तिसम, दृष्टान्तसम, प्रतिदृष्टान्तसम, अनुत्पत्तिसम, संशयसम, प्रकरणसम, अहेतुसम, अर्थापत्तिसम, अविशेषसम, उपपत्तिसम, उपलब्धिसम, अनुपलब्धिसम, अनित्यसम, नित्यसम, कार्यसम, अशा चोवीस प्रकारच्या आहे "**स्वव्याघातकम् उत्तरं जातिः**" म्हणजे दुसऱ्याचा दोष दाखविण्यासाठी उत्तर देतांना तें स्वतःवरहि उलटूं शकेल अशा स्वरूपाचें असल्यास त्यांत 'जाति' दोष उत्पन्न होतो, अशी जातीची व्याख्या न्यायसूत्रवृत्तींत केली आहे.

निग्रहस्थान म्हणजे पराजयाचें कारण. ज्या योगें वक्त्याचें भ्रान्तपण किंवा अज्ञान व्यक्त होतें असा दोष म्हणजे निग्रहस्थान. निग्रहस्थानें, प्रतिज्ञाहानि, प्रतिज्ञान्तर, प्रतिज्ञाविरोध, प्रतिज्ञासंन्यास, हेत्वन्तर, अर्थान्तर, निरर्थक, अविज्ञातार्थ, अपार्थक, अप्राप्तकाल (म्हणजे पंचावयवी वाक्यांचा क्रमत्याग), न्यून, अधिक, पुनरुक्त, अननुभाषण, अज्ञान, अप्रतिभा, विक्षेप, मतानुज्ञा, इत्यादि २२ प्रकारचीं आहेत.

अशा प्रकारें न्यायशास्त्रांतील प्रमाण, प्रमेय इत्यादि विषयांची मांडणी करण्यांत आलेली आहे. आजच्या बुद्धिवादाच्या किंवा मतप्रचाराच्या युगांत सत्यासत्याचा काटेकोर निर्णय करावयास शिकविणाऱ्या या शास्त्राचें महत्त्व किती आहे हें सांगावयास नकोच. अति प्रचीन काळापासून भारतीयांनीं या शास्त्राचें महत्त्व पूर्णपणें ओळखलें होतें. एका सुभाषितकारानें

> " मोहं रुणद्धि विमलीं कुरुते च बुद्धिं ।
> सूते च संस्कृतपदव्यवहारशक्तिम्-
> शास्त्रान्तराभ्यसनयोग्यतया युनक्ति ।
> तर्कश्रमो न तनुते किमिहोपकारम् ॥

या श्लोकांत वर्णन केलेलें न्यायशास्त्राचें महत्त्व यथार्थ नाही असें कोण म्हणेल.

('आकाशवाणी, नागपूर' च्या सौजन्यानें)

मराठवाड्यांतील एकमेव मराठी मासिक
मराठवाडा साहित्य परिषदेचें मुखपत्र
प्रतिष्ठान
दर महिन्याच्या १ तारखेस प्रसिद्ध होतें
समीक्षा, ललित, काव्य, संशोधन इत्यादि
विषयांवरील मौलिक साहित्य
आजच वर्गणीदार व्हा
वार्षिक वर्गणी रु. ५ किरकोळ अंक ८ आ.
जाहिराती स्वीकारल्या जातात
मराठवाड्याबाहेर एजन्सी देणें आहे. लिहा.
" प्रतिष्ठान " कार्यालय,
इसामिया बाजार,
हैदराबाद-दक्षिण.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एक लघुनिबंध —

साहित्यसाधना

अ. तु. वाळके

साहित्यनिर्मिति संबंधी कांही विचित्र संकेत आधुनिक समाजांत प्रचलित आहेत. साहित्याच्या वैपुल्यावरून एखाद्याची साहित्यसेवा पारखली जाते. तसेंच त्याच्या विद्वत्तेवरूनहि त्याच्या साहित्याचें मान ठरतें.

साहित्यसेवा हें एक असिधाराव्रत आहे हें मात्र फारच थोड्यांच्या ध्यानांत असेल.

कल्पनांचा विलास, विचारांचें भरमसाट वैविध्य आणि भाषेची सजावट हीं आज साहित्याचीं प्रमुख अंगें मानलीं जातात. तळमळ हा आणखी एक कारक गुण साहित्यिकांत हवा अशीहि समजूत आहे.

तेव्हा ठाकठीक भाषेंत तळमळीनें लिहावयाचें प्रसाधन लेखक करूं लागतो. त्यांतच ललित साहित्याचें तंत्र लेखकांना सांगून त्याबरहुकूम लिहिल्यास हुकुमी ललित साहित्य निर्माण होण्याचीं हमीहि कांही तांत्रिक देऊं लागले आहेत !

साहित्यविषयक अशा कल्पनांमुळे साहित्याच्या निर्मितीला ऊत यावा यांत मुळीच नवल नाही.

पण साहित्य ही एक अति कठीण कला आहे. साहित्यिकाला त्रिकालज्ञान हवें. मागच्या, चालू व पुढच्या काळांचा अंदाज त्याला प्रथम घेतां आला पाहिजे. या तिन्ही काळांतील समाजाचीं परिवर्तनें व त्याच्या गती त्याला ओळखतां आल्या पाहिजेत.

हें त्रिकालज्ञान यथार्थपणें होण्यास तो कोणत्याच काळाचीं समरसलेला नसावा. ही फार कठीण साधना आहे. कोणत्याहि एका काळाशीं तो समरसला की त्याचें ज्ञान सापेक्ष व लिप्त होतें; व त्यामुळे त्या अवस्थेचें योग्य मापन तो करूं शकत नाही.

तसेंच रसलिप्त साहित्यिकाकडून विलासी व भोगनिष्ठ साहित्याचीच निर्मिति व्हावयाची ! म्हणून साहित्यिकानें कोणत्याहि अवस्थेपासून स्वतःला अलिप्त राखण्याची कला प्रथम आत्मसात केली पाहिजे.

त्यानें कोणत्याहि प्रभावी व्यक्तीपासून अथवा व्यक्तिगटापासून स्वतःला अलिप्त ठेवलें पाहिजे. नुसत्याच विद्वान सेवायुक्तांकडून अथवा विद्वान पक्षनिष्ठांकडून मौलिक साहित्याची अपेक्षा करतां येणार नाही.

कांही वैशिष्ट्य अथवा सामर्थ्य प्राप्त झालें, मग तें वैचारिक असो, भाषिक असो अथवा दार्शनिक असो, त्याचा वापर फार संयमानें त्यानें केला पाहिजे. आपण योजतों त्या शब्दांचा दूरवर विचार करून जबाबदारीनें ते वापरले पाहिजेत, नाही तर समाजांत अकारण अनवस्था त्यामुळे निर्माण व्हावयाची !

सुचलेल्या प्रत्येक विचाराची दुसरी बाजू समजून घेण्याकरिता तपानुतपें तिष्ठत बसण्याची आणि स्वतःच स्वतःच्या विचारांचा निरास करून कांही सांगण्यासारखें उरूं न देण्याची वृत्ति त्यानें बाणवून घेतली पाहिजे. म्हणजे अगदी अपरिहार्य तेवढेंच शेवटीं (म्हणजे अनेक तपांनी) सांगण्याकरिता उरेल.

शाब्दिक विद्वत्ता आणि खरें ज्ञान यांतली तफावत त्याला कळली पाहिजे, आणि ज्ञान आणि प्रदर्शन यांचा विरोधहि त्यानें मनावर ठसवून घेतला पाहिजे.

साहित्यज्ञानाचे हे पहिले धडे ज्यानें गिरविले नाहीत त्यानें लिहिलेलीं तत्त्वज्ञानाचीं अथवा साहित्याचीं भाष्यें निरर्थकच होत. कारण शब्दांचें खरें ज्ञान बिबायला, शाब्दिक ज्ञानानंतर तपानुतपें अलिप्तपणें एकटें नुसतें तिष्ठत राहावें लागतें ! तें मोजकें संयमानें सांगण्याची कला अवगत होण्याकरिता तर मग किती धीर धरावा लागेल !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गडकऱ्यांच्या नाटकांतील विनोद

म. ना. लोही

उत्कृष्ट साहित्यापुढे उद्दाम काळाचें कांही चालत नाही. संस्कृत भाषेंतील वाङ्मयाचा आपल्याला लाभलेला वारसा याचीच साक्ष देत नाही काय ? मानवी भावना चिरंतन असतात. म्हणूनच त्यांना आवाहन करून सजवलेलं साहित्य सर्वत्र आणि सर्वदा प्रभावी ठरतं म्हणूनच गडकऱ्यांना इहलोक सोडून तीन तपांहून अधिक काळ लोटला असला तरी त्यांच्या नाटकांची गोडी अवीट आहे. या काळांत त्यांच्या साहित्यानं अनेकांना प्रेरणा दिली. गडकऱ्यांच्या एकेका कलाकृतीनं टीकाकारांना वुचकळ्यांत पाडलं. त्या साहित्यसरितेंत जों जों अवगाहन करावं तों तों नाविन्याचा साक्षात्कार होतो. हेंच त्या साहित्याच्या श्रेष्ठतेचं एकमेव गमक आहे.

हास्य आणि करुण हे परस्परविरोधी रस म्हणजे गडकऱ्यांच्या नाट्यवाङ्मयाचे प्राण ! कधी एकेकाला हाताशीं धरून तर कधी दोहोंना एकत्र आणून त्यांनी खेळवलं. सर्कसच्या रिंगणांत सिंह आणि शेळी यांचा खेळ करणाऱ्या रिंगमास्टरची आठवण व्हावी, एवढ्या कौशल्यानं एकाच नाटकांत त्यांना एकमेकांशेजारीं बसवलं. यांपैकी कुठल्या रसावर त्यांचं प्रभुत्व होतं याचा निर्णय लावणं कठीणच आहे. टीकाकारांत याबद्दल मतभेद आहेत. कुणी करुण रस हीच त्यांची शक्ति समजतं, तर कुणी हास्यरस अधिक प्रभावी सांगतं. त्यांच्या नाटकांतील रसांची खरी समीक्षा नाट्यगृहांत नाटक सुरू असतांना करणं शक्य आहे. पण प्रेक्षक म्हणून नाटकाचा आस्वाद घेत असतांना टीकाकार रंगभूमीवरील पात्रें, प्रसंग आणि नाट्य यांच्याशीं इतका समरस होऊन जातो को, तात्पुरती आपली भूमिका विसरून सामान्य प्रेक्षक बनून जातो. रंगभूमीवरील नाट्याचा प्रभाव मनावरून दूर झाल्यानंतर कदाचित् तो चिकित्सा करूं शकेल ! इतका रसोत्कर्ष साधण्याचं सामर्थ्य असलेल्या गडकऱ्यांच्या नाकटांतील हास्योत्पादक विनोदाचा विचार शक्य तों निःपक्षपणें करावयाचा आहे.

कला आणि जीवन यांची परस्परावलंबिता आणि संबंध हा विवाद्य विषय असून त्याचा निर्णय लागेल असं समजणं चुकीचं होईल. ललितसाहित्य आणि जीवन यांचे संबंध देखील असेच विवाद्य आणि गुंतागुंतीचे असतात. तथापि सामान्यतः जो एक चूक होते ती त्यांची गल्लत करण्याची. प्रत्यक्ष जीवन आणि वाङ्मयांत प्रतिबिंबित होणारं जीवन यांतील भेदाचा विसर पडलेला आढळून येतो. जीवनांत प्रत्यक्षानुभव असतो, तर वाङ्मयांत पुनःप्रत्यय असतो. विनोदाचा विचार करतांना याची जाणीव ठेवली नाही, तर अपरिहार्य तया अनर्थ होतो. जीवनांतील विनोद आणि वाङ्मयांतील विनोद यांच्या स्वरूपांत भेद असतो. जीवनांत अनुभवाला येणारा विनोद उत्कट आणि अकृत्रिम असतो तर वाङ्मयांतील विनोद खेळकर आणि कृत्रिम असतो. कारण विनोदी लेखकाला जें हास्योत्पादक दिसलं त्याचा दुसऱ्यांना प्रत्यय आणून द्यावयासाठी त्याला त्यावर संस्कार करावे लागतात. प्रत्येक मनुष्यास विनोदी दृष्टि असते, पण ती सुप्त असते. विनोदी लेखकांत ती जागृत असते. आणि आपल्या प्रतिभेनं तो इतरांमधील विनोदी दृष्टि जागृत करतो. तो ज्या दृष्टिकोनांतून भोवतालच्या जगाकडे पाहातो त्याच दृष्टिकोनांतून वाचकालाहि पाहावयास लावतो. यासाठी कौशल्य लागतं. कल्पकता लागते, मानसशास्त्राचं ज्ञान लागतं.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विनोदी लेखकाला विनोदी दृष्टि अत्यंत आवश्यक आहे.

प्रत्यक्ष विषयाला हात घालण्यापूर्वी मी विनोदाचं स्वरूप स्पष्ट करूं इच्छितों. कारण आजवर या विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि माझा दृष्टिकोन यांत भिन्नता आहे. थॅकरे आणि कोलरिज, हॅझलिट आणि मेरिडिथ किंवा लीकॉक आणि इलिएट यांनी विनोद हा वस्तुनिष्ठ आहे असंच गृहित धरलेलं आहे. मराठींत देखील सामान्यत: टीकाकार विनोदाला वस्तुनिष्ठच समजतात. वस्तुत: विनोद हा देखील सौंदर्याप्रमाणेच वस्तुनिष्ठ नसून व्यक्तिनिष्ठ आहे. हें विधान करण्यांत मी धाडस करीत आहें याची मला जाणीव आहे. म्हणूनच विनोदाच्या व्यक्तिनिष्ठतेचा थोडा विचार करूं.

हास्य ही एक स्वतंत्र सहजप्रवृत्ति आहे असें मॅक्डुगल मानतो तर ती क्रीडाप्रवृत्ति आहे असें मॅक्स-ईस्टमन मानतो. मानसशास्त्रज्ञांच्या मतें क्रीडाप्रवृत्ति ही देखील एक सहजप्रवृत्ति आहे. हास्य ही उपजतवृत्ति असल्याचें 'रसविमर्ष'कार देखील मानतात. आनंदाचें हास्य, प्रेमाचें हास्य आणि वात्सल्याचें हास्य हे या उपजत वृत्तींतून उद्‌भवणाऱ्या हास्याचे प्रकार म्हणून दाखवतां आले तरी त्यांचें स्वरूप शुद्ध Instinctive नसतें. ज्ञान आणि अनुभव यांची जोड मिळाल्यावर सहजप्रवृत्तीचें रूपांतर स्थिरवृत्तींत होतें. विजयाचें हास्य, विनोदांतून उद्‌भवणारें हास्य आणि उपहासात्मक किंवा उपरोधिक हास्य हे स्थिरवृत्तीशीं संबंधित हास्यांचे प्रकार होत. एखादी व्यक्ति, एखादा प्रसंग किंवा एखादा संवाद आपल्याला हसवतो. म्हणजे आपल्यांतील हसण्याची जी उपजत वृत्ति आहे तिला चेतना देतो. म्हणूनच सामान्यत: हास्यनिर्मितीचं कारण व्यक्ति, प्रसंग अगर संवाद समजला जातो. पण हा गैरसमज आहे. कारण तसं असतं तर कोणत्याहि विनोदी प्रसंगानं (व्यक्ति आणि संवाद यांचा आपण यांतच समावेश करूं) प्रत्येकाला समप्रमाणांत हसवलं असतं. साखर किंवा मध प्रत्येकालाच गोड लागतात ना? अगदी सारखेच गोड लागतात ना? मग विनोदी प्रसंगांतून उद्भवणारं हास्य प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणीं सारख्याच प्रमाणांत कां आढळूं नये? विदूषक अगर वेडा पाहून मुलं व असंस्कृत माणसं हसतात. आपल्याला हसूं येत नाही. तमाशांतील अश्लील संवादांनी असंस्कृत माणसाची करमणूक होते, तर सुसंस्कृत माणसाला चीड येते. असें कां व्हावें? कारण विनोदाचं अधिष्ठान वस्तूंत नसून व्यक्तींत आहे. जर विनोद वस्तूंत अगर प्रसंगांत नसतो तर प्रेक्षकांतच तो सुप्तपणानं वावरत असतो. "माणसाला हसवतं तें विसंगतिदर्शन, पदार्थ नव्हे." पण ही विसंगति तरी कोठे असते? ती पाहणाऱ्याच्या दृष्टिकोनांत असते, आपल्या भोवतालच्या पदार्थांबद्दल किंवा व्यक्तीबद्दल आपली व्यवस्थेची एक कल्पना (Idea of the Norm) असते. तिला धक्का बसला की हसू येतें. "Humour is thus a perception of incongruity through ideas already existing in the individual." (A Theory of laughter) आपल्या रूढ धारणांना नवीन ज्ञानामुळें धक्का बसतांच आपण हसूं लागतों. म्हणूनच विनोदी लेखक नेहमी या नवीन ज्ञानाच्या शोधांत असतो. तो असम्बद्धता आणि विसंगति हुडकून काढतो. तात्पर्य, विनोद हा वस्तुनिष्ठ नसून व्यक्तिनिष्ठ आहे. हा एक स्वतंत्रच विषय होईल, म्हणून अधिक तपशिलांत न शिरणेंच इष्ट होईल.

आणखी एक गोष्ट नमूद करणें आवश्यक आहे. ती म्हणजे मराठींतील 'विनोद' या शब्दाचा वापर. इंग्रजींत Humour या शब्दाला एक निश्चित अर्थ आहे. आणि Comic, Fun, Jest असे विनोदाचे भेद स्पष्ट करणारे शब्द अस्तित्वांत आहेत. तसा प्रकार मराठींत नाही. किंबहुना उपहास (Satire), उपरोध (Sarcasm) किंवा विडंबना (Parody) यांनी भरलेल्या वाङ्मयालाहि विनोदी म्हणूनच संबोधण्यांत येतें. आपण सरसकट सर्वच प्रकारच्या हास्योत्पादक वाङ्मयाला विनोदी म्हणून म्हणतों. तरी समीक्षकांनी विनोद या शब्दाची अशी गल्लत करूं नये असें मला प्रामाणिकपणें वाटतें.

नाटकांतून हास्यनिर्मिती करण्यासाठी वर उल्लेखिलेल्या सर्वच प्रकारांचा उपयोग केला जातो. तथापि

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विनोद (Humour) हा साधारणतः श्रेष्ठ समजला जातो. त्याच्या खालोखाल कोटि अगर विनोदवचन (Wit) आणि सर्वांत शेवटीं अंगिक किंवा विदूषकी विनोद (Comic) यांना स्थान आहे. एकोणिसाव्या शतकांतील इंग्रजी पंडितांनी विनोद या अर्थी Comic हा शब्द वापरलेला दिसून येतो. या शब्दांत त्यांनी सर्वच प्रकारच्या साधनांचा वापर करणाऱ्या लेखकांची संभावना केली आहे. गडकऱ्यांना खरोखरीच Comic Writer च म्हणावयास पाहिजे. याला दोन कारणें आहेत. पहिलं हें की, त्यांचा उद्देश सुधारणेचा नसून मनोरंजनाचा होता. हें विधान काही लोकांना पटणार नाही, याची मला जाणीव आहे. आज ज्या स्वरूपांत त्यांचीं नाटकें उपलब्ध आहेत. त्या स्वरूपांत मी त्यांचा विचार करीत आहें. समाजसुधारणेचा हेतु मनांत ठेवून त्यांनी नाटकें लिहिलीं असतीं तर पुण्यप्रभाव सुखान्त आणि प्रेमसंन्यास दुःखान्त झालें नसतें. विनोदी प्रवेश, प्रसंग अगर पात्रें रंगवतांनाहि त्यांनी मनोरंजनाचाच हेतु पुढे ठेवला असावा हें स्पष्ट होतं. दुसरं कारण त्यांतील विनोदाचं स्वरूप. त्यांच्या नाटकांत सर्व प्रकारचा विनोद आढळतो. त्यांत उपरोध आहे, सहृदयतेचा अभाव आहे, अतिशयोक्ति आहे. त्यांतील विभिन्न प्रकारचा विनोद पाहिला म्हणजे त्यांना Humorist म्हणण्याऐवजी Comic म्हणणं अधिक समर्पक होईल.

विनोद (Humour) हा साधारणतः श्रेष्ठ समजला जातो असं मी म्हटलं तें विवेचनाच्या सोईसाठी. कोटि (Wit) ही देखील निर्भेळ हास्यनिर्मितीच्या दृष्टीनं त्याच तोलाची आहे. दोन्ही मनोरंजन करणारीं म्हणून एकाच जातीचीं असल्याचें 'ली हंट' सांगतो. तर कोटि ही अधिक कलात्मक व कल्पकतापूर्ण म्हणून वरचढ असल्याचें हॅझलिट सांगतो. उलट आपले टीकाकार विनोदाला डोक्यावर घेऊन नाचतात तर कोटीला नाक मुरडतात. विनोद नैसर्गिक तर कोटी कृत्रिम, हा त्यांच्यांतील प्रमुख भेद; पण कोटी करण्यासाठी किंवा समजण्यासाठी चातुर्य आणि सुसंस्कृतता हवी. विनोद दुःसाध्य आणि कोटी सहजसाध्य असाहि गैरसमज करून घेतलेला आढळतो. पण वस्तुस्थिति उलट आहे. "Humour, with its less demand on mental ripeness, is of earlier growth" असं कुणा समीक्षकानं म्हटलं तें अगदी बरोबर आहे.

गडकऱ्यांनी लोकांना हंसविण्यासाठी कोटयांचा वापर केला म्हणून त्यांनाही नाकं मुरडणारे टीकाकार आहेत. गडकरी कोटिबाज होते. याबद्दल दुमत होण्याचं कारणच नाही. त्यांनी नाटकांत स्थळ, काळ किंवा पात्र यांचा विचार न करतां कोटया उधळल्या. संयमाचा अभाव हा दोष केवळ कोटिपुरतांच मर्यादित नसून त्यांच्या संपूर्ण वाङ्मयांत आढळतो. शिवाय कोटयांच्या अतिरेकाला आणखी एक कारण म्हणजे कोल्हटकरांवर मात करण्याची अनिवार इच्छा. त्यांच्या प्रत्येक कोटीचं विश्लेषण श्री. शि. गो. भावे यांनी आपल्या 'गडकरी यांचा विनोद' या प्रबंधांत केलेलं आहे. म्हणून तेवढं न करतां कांही निवडक स्थळांचा संक्षेपानं विचार करूं. विशेषतः श्री. खांडेकर आणि श्री. भावे यांनी अश्लील म्हणून ठरवलेल्या कोटयांबद्दल मला विचार करावयाचा आहे. उभय टीकाकारांच्या अश्लीलतेच्या कल्पना अतिरेकी स्वरूपाच्या वाटतात. प्रेमसंन्यासांत गोकुळाच्या तोंडी खालील विनोद-वचनें घातलेलीं आढळतात—"एकूण अंगवस्त्राच्या गांठीपेक्षां लग्नगाठच बरी म्हणायची !" "विजापुरच्या मुलुखमैदान तोफेच्या आवाजानें नुसत्या गर्भिणींचेंच गर्भपात झाले म्हणतात ! पण हिच्या तोंडाची तोफ सुरू झाली म्हणजे माझ्यासारख्या पुरुष सुद्धा गर्भ-गळित होतो !"

" तिच्या गालावर तोंडसुख घेण्याचा माझा अधिकारच नाही का ?" आजच्या कोणत्याहि वाचकाला अगर प्रेक्षकाला यांत कांही अश्लील वाटेल असं वाटत नाही. नव्हे, त्याकाळीं देखील तसं वाटत नव्हतं. प्रेमसंन्यासाच्या प्रस्तावनेंत श्री. गो. वि. भाटे लिहितात—"या विनोदाची खूबी ही आहे की, त्यांत अश्लीलपणाचा, फाजीलपणाचा बीभत्सपणाचा, कुत्सितपणाचा किंवा हिडिसपणाचा अंश देखील नाही." ही वस्तुस्थिति आहे. पहिलं वाक्यच घ्या. त्यांतील सहापैकीं तीन शब्दावर श्लेष आहे. आणि हा श्लेष कळण्यासाठी भाषेचे चांगलें ज्ञान पाहिजे. तसेंच या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
अनुक्रमणिका

श्लेषांत कांही बीभत्स, अश्लील किंवा लैंगिक असें कांहीच नसतां त्याला अश्लील कां म्हणावयाचें ? दुसऱ्यांत मौजेचा विरोध दाखवला आहे. त्यांतील 'गर्भ' या एकाच शब्दामुळे बावचळून जाण्यासारखें काय आहे ? तिसरं वाक्यदेखील श्लेषयुक्त आणि सूचक आहे. पण तें ऐकून आपल्या मनांत कुठली विकृत भावना जागृत होते ? मग त्याला अश्लील कां म्हणण्यांत आलें ? याला कारण टीकाकारांचा विकृत दृष्टिकोन. वास्तविक कोटीला अश्लील ठरवतांना तिचा प्रेक्षक किंवा वाचक यांच्यावर होणारा परिणाम लक्षांत घ्यावयास नको का ? तसा परिणाम लक्षांत घेतला तर या कोट्यांचा अर्थ करून कुठलेहि मनोविकार जागृत होत नाहीत, लैंगिक भावना चाळवल्या जात नाहीत असेंच आढळून येते. म्हणून मी तरी या कोट्यांना अश्लील म्हणावयास तयार नाही. श्री. खांडेकर आणि श्री. भावे यांच्या टीकाग्रंथांना प्रकाशित होऊन दोन तपें लोटल्यावर तसं म्हणण्याचं कारणहि उरलेलं नाही. कारण आपल्या नैतिक कल्पना बऱ्याच बदललेल्या आहेत. दुसरी गोष्ट अशी की प्रेमसंन्यास लिहिलं गेलं ती गडकऱ्यांच्या नाटचलेखनाची प्रारंभिक आणि प्रायोगिक अवस्था होती. पुढे त्यांनी शाब्दिक कोट्यांना काबूत आणलं. तरी तो त्यांच्या व्यक्तित्वाचा एक पैलू असल्यामुळे त्यांच्या नाटचलेखनांत कोटीनं आपला शिरकाव करून घेतलाच ! त्यांच्या कोटिबाजपणाला त्यांची चमत्काराची हौस देखील कारणीभूत झाली.

तथापि गडकरी निव्वळ कोटिबाज नव्हते. हास्यनिर्मितीसाठी त्यांनी विनोदाचा वापर देखील दिलखुलासा केला. त्यांनी निर्माण केलेल्या व्यक्तिरेखा अपूर्व ठरल्या आहेत. त्यांच्यांतील विनोदी प्रज्ञेचा (Comic Genius) तेजस्वी विलास त्यांच्या विनोदी व्यक्तिरेखांतून आणि विनोदी प्रसंगांच्या योजनेंतून सहज दृग्गोचर होतो. त्यांचे गोकुळ, महेश्वर आणि घुंडिराज हे तीन मानसपुत्र मराठींतील विनोदी वाङ्मयाचे अलंकार आहेत. तसेंच निरनिराळ्या नाटकांतील पताकास्थानाचे प्रसंग बहारदार आणि गमतीचे आहेत. तथापि कांही टीकाकार त्यांना विनोदकार (Humorist) मानावयास तयार नाहीत. याची मीमांसा करतांना एका टीकाकाराने शुद्ध विनोदाची तीन लक्षणं सांगितलीं आहेत. त्याच्या मतें विनोदाला स्वाभाविकता, सहृदयता आणि सद्बोध अत्यंत आवश्यक आहेत. सद्बोध सोडून इतर दोन कुणालाहि अमान्य होऊं नयेत. पण विनोदाला बोधाचें शेपूट चिकटविणं मला मान्य नाही. सुधारणा हा विनोदाचा एक हेतु असतो हें मान्य करून देखील मनोरंजन हें विनोदाचं ध्येय नजरेआड करतां यावयाचं नाही. किंबहुना, जीवनाच्या खडतरतेची विस्मृति करून देण्यासाठी माणसाला हसवणं, रिझवणं, आणि प्रसन्न करणं हाच विनोदाचा हेतु नाही का ? जीवनांतील निराशा, अपयश आणि कडवटपणा यांची तीव्रता कमी व्हावी म्हणूनच विनोदाचा अवतार झाला. विनोदी लेखकाचं कार्य उपदेशकाचं किंवा शिक्षकाचं नाही. तसंच तें विदूषकाचं देखील नाही. त्याचं कार्य समाजांतील विनोद दृष्टि (sense of Humour) जागवणं हेंच होय. म्हणून विनोदांतून सद्बोध व्हावा अशी अपेक्षा व्यर्थ आहे.

विनोदांत स्वाभाविकता आणि सहृदयता असावी हें सामान्यतः मान्य करायला हरकत नाही. सामान्यतः हा शब्द हेतुपुरस्सर वापरलेला आहे. कारण विनोदांतर्गत स्वाभाविकता म्हणजेच पर्यायानं वाङ्मयांतील स्वाभाविकता होय. आणि प्रत्यक्ष जीवन व वाङ्मयांतील जीवन यांत एक सीमारेषा असते. ही स्वाभाविकता एका मर्यादेपर्यंतच स्वाभाविकता असू शकते. हा भेद विसरून चालणार नाही. सहृदयतेचंहि असच आहे. विनोदांतील सहानुभूति प्रमाणबद्ध असते. विनोदांतील सहानुभूति भाजींतील मिठाप्रमाणे असते. तिचं प्रमाण कमी पडलं तरी किंवा अधिक झालं तरी विनोद नष्ट होतो. ह्या मर्यादा लक्षांत घेऊनच आपल्याला ही दोन लक्षणं मान्य करावी लागतात. आणखीहि एक गोष्ट आपल्याला ध्यानांत ठेवावी लागते. ती म्हणजे विनोदी लेखकाची विनोदी व्यक्ति अगर प्रसंगाकडे पाहण्याची वृत्ति वाचकाला किंवा प्रेक्षकाला अगम्य असते ही ! विनोदी व्यक्तीबद्दल त्याच्या हृदयांत किती सहानुभूति आहे हें पाहण्यापेक्षा प्रेक्षकांच्या मनांत तो किती सहानुभूति निर्माण करूं शकला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हेंच लक्षांत घेणं सोयीस्कर असते. शिवाय विनोद हा वस्तुनिष्ठ नसून व्यक्तिनिष्ठ आहे याचाहि विसर पडूं देतां कामा नये. म्हणजेच पर्यायानं साधनापेक्षा साध्याकडेच दृष्टिक्षेप करावयास पाहिजे.

या दृष्टिकोनांतून गडकऱ्यांच्या विनोदाचा विचार करूं. गडकऱ्यांचं पहिलं नाटक 'वेड्यांचा बाजार' हें एक अपूर्ण प्रहसन आहे हें सर्वांना माहित आहे. यांत कोणत्या ना कोणत्या वेडाच्या आहारी गेलेले नमूने एकत्र आणले आहेत. त्यांच्या वेडाचा अतिरेक आणि त्यांतून उत्पन्न होणारे घोटाळे हा नाटकांतील विनोदाचा विषय आहे. यांत अस्वाभाविक कांही म्हणतां येईल काय? या नाटकांत कोट्यांचा सुकाळ असला आणि गैरसमजाचा गोंधळ असला तरी त्यांतील अधिक भाग स्वभावनिष्ठ आणि प्रसंगनिष्ठ विनोदानें व्यापला आहे. स्वभाव आणि प्रसंग यांतून अद्भुत विनोद वरच्या दर्जाचा म्हणून सर्वांनीच वाखाणलेला आहे. वेड्यांच्या बाजारांत किंचित अतिशयोक्ति असली तरी ती व्यक्तिरेखांच्या स्वाभाविकतेला मारक नाही. परिणामाच्या दृष्टीनं हे प्रहसन यशस्वी ठरलं आहे.

'प्रेमसंन्यास' या नाटकांतील विनोदी व्यक्तिरेखा गोकुळची आहे, ही व्यक्तिरेखा विपर्यस्त व विसंगत वाटते असं कांही टीकाकार म्हणतात. उलट ती व्यक्तिरेखा अधिक स्वाभाविक व वास्तव म्हणण्यालायक पुरावा गडकऱ्यांच्या आठवणींत मिळतो ती व्यक्तिरेखा नाटकमंडळींतील एका व्यक्तीवरून उचलली असल्याचं मी वाचलेलं आहे, तिच्या वाङ्मयीन आवृत्तींत अतिशयोक्तीची मात्रा थोडी अधिक झाली इतकेंच. तसा कथानकाशीं गोकुळचा संबंध यथातथाच असला तरी लक्षांत राहतो तो गोकुळच. उर्दू नाटकांतील हश्र काश्मिरी यांच्या स्वतंत्र विनोदी उपकथानकाच्या पद्धतीचा अवलंब केल्यामुळे कथानकाच्या विकासाच्या दृष्टीने गोकुळचें उपकथानक निरुपयोगी खरेंच. पण गंभीर प्रवेशानंतरचे गोकुळचे विनोदी प्रवेश प्रेक्षकांच्या मनावरचा ताण कमी करण्याचें कार्य उत्तम रीतीनें बजावतात. त्यांतील प्रसंगनिष्ठ विनोद विशेषतः विद्याधरासमोर गोकुळ मथुरेची कुचाळकी करीत असतांना त्याच्या नकळत तिचा प्रवेश असलेल्या प्रवेशांत-उत्कृष्ट साधलेला आहे. गोकुळच्या व्यक्तिरेखेबद्दल गडकऱ्यांवर असा आरोप केला जातो की, गोकुळच्या जन्मजात विसरभोळेपणावर आधारलेला विनोद शुद्ध म्हणतां येणार नाही. कारण त्या दोषाला तो जबाबदार नाही. थोड्या फार प्रमाणांत हें खरं असलं तरी गोकुळचा आपण तिरस्कार करतो का? उलट त्याच्याविषयी आपल्याला सहानुभूतीच वाटत नाही का? प्रथमदर्शनी आपण गोकुळला हसतो पण नंतर आपल्याला पश्चाताप होतो. समजा कुणाला तेवढी सहानुभूति वाटली नाही तरी आपण गोकुळच्या विसरभोळेपणाला कां हसतो याचा विचार केला तर गोकुळच्या चित्रणांत हृदयहीनता नसून विसंगतीचं मनोहारी दर्शन घडवलेलं आहे हें लक्षांत येईल. आपण गोकुळच्या विसरभोळेपणाला किंवा त्याच्या कुचाळीला हसत नाही. त्याच्या दर्शनानं, कृतीनं आणि विसरभोळेपणानं आपल्या रूढ कल्पनेला जो विस्मयाचा धक्का बसतो, या दोन कल्पनांत जी असंबद्धतां अगर विसंगति आढळते, ती आपल्याला हसवते. मग गोकुळबद्दल किंवा गडकऱ्यांबद्दल दुराग्रह करून घेण्यांत काय अर्थ आहे?

पुण्यप्रभावांत विनोदाचा मक्ता मूर्खपणानं घेतला आहे. आणि मूर्खपणा हा सर्वत्र आणि सर्वदा विनोदविषय ठरला आहे. मोलियर आणि शेक्सपियर याचा उपयोग करतांना आढळतात. तथापि पुण्यप्रभावातील कल्पनानिष्ठ विनोद मनोहारी आहे. कंकणानं चित्रांचा क्रम बदलल्या कारणामुळं नूपुर उलट्या क्रमानं उपमा देऊन किंकिणीचं वर्णन करतो तो प्रसंग किंवा एकाच पेटाऱ्यांत सुदाम आणि नूपुर यांना लपवण्याचा प्रसंग हे याचे पुरावे होत. शाब्दिक विनोद, कल्पनायुक्त विनोद आणि प्रासंगिक विनोदाची या नाटकांत रेलचेल आहे. मूर्खपणा हा स्वभावदोष विनोदविषय असल्यामुळे सहानुभूति उत्पन्न होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. अस्वाभाविकता मूर्खपणाला उठावच देते.

'एकच प्याला' नाटकांत विनोदी व्यक्तिरेखेचा अभाव आहे. एकच प्याल्यांतील विनोदाचें मूळ स्वभावदोषांत नसून सामाजिक दोषांत आहे. भोवतालचे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जीवन किती तकलादी आहे हें दाखविण्यासाठी गडकऱ्यांनी आर्यमदिरामंडळाची योजना केली. कुणी तळिरामला विनोदी समजतात. पण ती चूक होईल. तळिराम विनोदी नाही तुच्छतावादी (cynic) आहे. तो श्रद्धाहीन आहे. उपरोधिक बोलणारा आहे. तो जे बोलतो तें बुद्धीला पटलं नाही तरी विचार करावयाला लावते. तो चतुर, बुद्धिमान आणि कोटिबाज असला तरी त्याच्या दृष्टिकोन विक्षिप्त आणि विसंगत आहे. याची साक्ष पहिल्याच दर्शनांत होते. एकच प्याल्यांत प्रसंगनिष्ठ विनोदच अधिक आहे. यांतील विनोदाचा उपयोग गंभीर प्रवेशांचा ताण कमी करण्यासाठीच आहे. मदिरामंडळांतील मंडळींची बडबड मौजेची (Funny) म्हणून आपल्याला हंसवते. ही मौज देखील त्यांच्या बडबडीनं किंवा गोंधळानं म्हणूं या, आपल्याला धारणेला मिळणाऱ्या धक्क्यांतूनच निर्माण होते, त्यासाठीं आवश्यक असणारी दृष्टी किंवा ज्ञान आपल्यांत नसेल तर त्या मौजेंतहि मौज वाटणार नाही.

'भावबंधन' या आपल्या अंतिम पण उत्कृष्ट सुखात्मिकेंत गडकऱ्यांनी विनोदी प्रज्ञेचा पुरेपूर प्रत्यय आणून दिला. त्यांतील विसराळू, व्यवहारशून्य आणि बडबड्या धुंडिराजांत मूर्तिमंत विनोद अवतरला आहे. त्याचं चित्रण अत्यंत हळूवार हातानं केलं गेलं आहे. अगदी पहिल्याच प्रवेशांत म्हातारा प्रेक्षकांच्या मनाची पकड घेतो. त्याच्या रेखाटणांतील स्वाभिकता आणि सहृदयता याबद्दल सर्वच टीकाकारांचें एकमत आहे. शिवाय गडकऱ्यांना अवगत असलेल्या सर्वच साधनांचा विनोदनिर्मितीसाठी त्यांनी पुरेपूर उपयोग करून घेतला. त्यामुळे प्रसंगनिष्ठ विनोदाचीं देखील भावबंधनांत वाण नाही.

तात्पर्य, विनोदी व्यक्तिरेखा आणि विनोदी प्रसंग यांच्याद्वारें गडकऱ्यांनी उत्कृष्ट विनोद (Humour) साधला आहे. त्यांनी वापरलेल्या साधनांची चिकित्सा करीत बसण्यापेक्षा त्यांनी अपेक्षिलेल्या साध्याकडे लक्ष दिल्यास विनोदकार म्हणून त्यांच्या यशस्वीतेबद्दल यत्किंचित शंका उरत नाही. साधनांचा विचार न करण्याचें कारण विनोदाचें व्यक्तिनिष्ठ स्वरूप. विनोदाचें अधिष्ठान प्रेक्षकांत किंवा वाचकांत असतं. त्यांच्या विनोदी वृत्तीला चाळवण्यासाठी लेखक किंवा नाटककार आपल्या ज्ञानानुरूप साधनांची योजना करतो. गडकऱ्यांच्या विनोदाची विफलता अगर सफलता या दृष्टिकोनांतून ठरवावयास पाहिजे.

तथापि गडकऱ्यांना कोटिबाज (Wit) किंवा विनोदकार (Humorist) ठरवणं म्हणजे त्यांना अन्याय करणं आहे. गडकरी Comic poet होते. विनोद निर्मितीमागील भावुकता आणि कल्पकता लक्षांत घेतली तर. माझं म्हणणं कुणालाहि पटेल. शेक्सपियरचं मूल्यांकन करतांना हॅझलिट म्हणतो—" Shakespeare was a greater poet than wit; his imagination was the leading and master-quality of his mind which was always ready to soar into its native element. The ludicurous was only secondary and subordinate." मला वाटतं, गडकऱ्यांना हें विधान तंतोतंत लागूं पडतं. प्रतिक्षणीं त्यांची कल्पकता प्रतिभेच्या पंखांवर आरूढ होऊन जीवनाचा वेध घेत वाङ्मयवितानांत उड्डाण करण्याला उद्युक्त असते. कोट्यांच्या अतिरेकाला कल्पकताच कारणीभूत होतें तर कृत्रिमतेला प्रोत्साहित करते. हीच कल्पकता महेश्वराच्या तोंडून विरहाच्या सहा अवस्था वदवते, नुपुराला उलट्या कमानं उपमा देऊन त्रिकोणीचं वर्णन

'श्री गुरुदेव'
मानवसमाजाच्या सर्वांगीण उन्नतीस
वाहिलेलें मासिक
श्री गुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज, मोझरी
हिंदी-मराठी विभागात्मक वा. मूल्य रु. ५]
हिंदी विभागात्मक [वा. मूल्य रु. ३

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करावयाला लावते, तळिरामला मदिरापान नीतिमत्तेला पोषक असल्याच पटवून द्यावयाला भाग पाडते. आणि विसरभोळ्या गोकुळला कोर्टाची पायरी चढावयाला लावते.

गडकऱ्यांची विनोदी प्रतिभा (Comic Muse) ही देखील त्यांना Comic poet सिद्ध करायला समर्थ आहे. दुर्दैवानं तिचा पूर्णाविष्कार पाहण्याचं भाग्य महाराष्ट्राला लाभलं नाही. पण तिचा प्रत्यय त्यांच्या विनोदी वाङ्मयांतून पदोपदी येतो. "विनोदी लेखक या नात्याने गडकऱ्यांची प्रतिभा कोल्हटकरांच्या प्रतिभेपेक्षा अधिक पैलूदार व पल्लेदार आहे." असा अभिप्राय तात्यासाहेब केळकरांनी देऊन ठेवलेला आहे. त्या विनोदी प्रतिभेचे नवनवीन पैलू त्यांच्या नाटकांतून वाचकांच्या प्रत्ययाला आले आहेत. त्यांच्यांत विनोदी प्रतिभेचा अभाव असता तर ते कदापि कोल्हटकरांवर मात करूं शकले नसते. गडकऱ्यांत विनोदी प्रतिभा नसती तर आपलं दुःख लपवून लोकांना हसवण्यांत ते यशस्वी झाले नसते. पण अनुकरण व स्पर्धा यांच्या आहारीं गेल्यामुळे त्यांच्या विनोदी प्रतिभेची कुचंबणा झाली. तिला आपले पंख पसरता आले नाहीत. कालिदासाच्या काळीं नाटककाराला कवि म्हणत. आधुनिक नाटककारांत हें संबोधन इतर कोणाहीपेक्षा गडकऱ्यांना यथार्थतेनं लागूं पडतं !

हें सर्व खरं असलं तरी गडकऱ्यांच्या विनोदाचा विचार करतांना एका गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यामुळे त्यांना अन्याय होत आलेला आहे. ती गोष्ट म्हणजे गडकऱ्यांच्या काळांतील व तत्पूर्वीचा विनोद. तत्कालीन नाटककारांचा विनोद पाचकळपणाचा आणि बीभत्स स्वरूपाचा असे. त्यांत Comic अधिक असायचें. कारण ती विनोदाची प्रारंभिक अवस्था होती. आधीच्या मराठी वाङ्मयांतील उच्च दर्जाचा वारसा त्याला लाभला नव्हता. संस्कृत साहित्यशास्त्रानं हास्यरसाला स्वतंत्र स्थान दिलेलं असलं तरी साहित्यांत त्याला मानाचं स्थान मिळालं नाही. संतांनी 'टवाळा आवडे विनोद' म्हणून त्याची संभावना केली. शाहीर जाणून बुजून खालच्या थराच्या समाजाचे कवि. त्यांच्या विनोदांत अश्लीलताच अधिक. वरच्या दर्जाचा शाब्दिक व प्रसंगनिष्ठ विनोद कोल्हटकरांनीच आणला त्यामुळे गडकऱ्यांवर संस्कार झाले ते कोल्हटकरांचे. लवकरच त्यांनी आपल्या विनोदी प्रतिभेनं कोल्हटकरांना हतप्रभ केलं. पण त्यापुढे त्यांची मजल गेली नाही. विनोदाच्या त्या प्रायोगिक अवस्थेत देखील गडकऱ्यांच्या प्रतिभेनं जे चमत्कार करून दाखवले त्याबद्दल गडकरी प्रसंशेला पात्र आहेत. आज विनोदाचा विकास झाला आहे. या विकसित स्वरूपाच्या विनोदाशी तुलना करून त्यांच्या उणीवा काढणं कितपत न्याय्य आहे? त्यांच्यानंतर त्यांचा एक संप्रदाय निर्माण झाला हें त्याच्या यशाचें गमकच नाही काय?

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रं थ स मा लो च न

नाटककार वरेरकर

[प्रथम खंड : वरेरकरांचीं पांच नाटकें, पृष्ठे १४०, मूल्य तीन रुपये.

लेखकः– प्रा. माणिक के. वैतुले श्री. बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर.

प्रकाशकः–के. सी. वैतुले, रुईकर पथ, नागपूर २]

नागपूरच्या श्री. बिं. नगर महाविद्यालयांतील मराठीचे प्राध्यापक श्री. माणिक के. वैतुले यांनी वरेरकरांच्या नाटकांवर एम्. ए. विभाग १ च्या विद्यार्थ्यांपुढे व्याख्यानें देण्यासाठी केलेल्या परिश्रमाचें फळ म्हणजे प्रस्तुत ग्रंथ होय. स्वतः ग्रंथकर्त्याच्याच भाषेंत सांगायचें तर विद्यार्थ्यांना 'सूत्रबद्ध मार्गदर्शन करून वरेरकरांचें सम्यक् दर्शन घडवावें या बुद्धीने' प्रस्तुत पुस्तकाची रचना झालेली आहे व पुस्तकाचें स्वरूप पाहतां अपेक्षित हेतुपूर्तीच्या दृष्टीने प्रस्तुत प्रयत्न यशस्वी झालेला आहे. आपल्या हेतूला लेखकानें अशा प्रकारें मर्यादा आखलेली असल्याने पुस्तकाचें स्वरूप वरेरकरांच्या नाटकांचें समीक्षण करणारें नाही. वरेरकर व त्यांचे समकालीन अन्य नाटककार यांच्या नाटचकौशल्याची तुलनात्मक चर्चा त्यांत आलेली नाही, इत्यादि आक्षेप अर्थातच निराधार ठरतात. मला वाटतें, लेखकाचा प्रस्तुत प्रयत्न म्हणजे विद्यार्थीवर्गाव्यतिरिक्त अन्य रसिकांची अपेक्षा पूर्ण करणाऱ्या वरेरकरांच्या नाटकांवरील चिकित्सक स्वरूपाच्या स्वतंत्र टीकाप्रबंधाच्या निर्मितीचें प्रसादचिन्ह असावें. तसें असेल तर प्रस्तुत ग्रंथांतून व्यक्त होणारा लेखकाचा साक्षेप त्याची वस्तुनिष्ठ टीकादृष्टि आणि सूक्ष्म अभ्यासाची प्रवृत्ति यांमळे तो प्रबंध मराठी टीकावाङ्मयांत मोलाची भर शकणारा असाच ठरेल असा अंदाज व्यक्त करण्यास हरकत नाही.

प्रस्तुत ग्रंथांत वरेरकरांच्या (१) हाच मुलाचा बाप; (२) संन्याशाचा संसार, (३) सत्तेचे गुलाम, (४) सिंगापूरांतून आणि (५) भूमिकन्या सीता या पांच नाटकांचा विचार केलेला आहे. व तो करतांना सामान्यतः नाटकाची मांडणी व तंत्र, नाटकाचें उद्दिष्ट व त्याचें साफल्य-वैफल्य, संविधानक, संघर्ष, नाटचविनोद, स्वभावचित्रणें आणि नाटकांतील गुणदोष या मुद्यांवर विशेष भर दिला आहे. वरेरकरांचें मराठी रंगभूमीवरील कर्तृत्व असामान्य व निर्विवाद आहे हें कोणीहि अमान्य करणार नाही व मराठी रंगभूमीच्या इतिहासाचें अध्ययन करण्याची इच्छा बाळगणाऱ्या व्यक्तीला त्यांच्या नाटचवाङ्मयाचा परामर्श घेतल्याशिवाय पुढे जातां येणार नाही. वरेरकरांना अशा प्रकारें मराठी वाङ्मयांत अनन्यसाधारण स्थान प्राप्त झालें असूनहि त्यांच्या नाटच-कादंबऱ्यादि साहित्याचें प्रामाणिक मूल्यमापन करणारा एकहि टीका ग्रंथ अद्याप उपलब्ध झालेला नाही, ही खेदाची गोष्ट होय. (श्री. द. रा. गोमकाळे यांनी वरेरकरांच्या नाटकांवर प्रबंध लिहिण्याचा जाहीर संकल्प सोडलेला आहे हें येथे नमूद करतों) प्रा. वैतुले यांच्या या ग्रंथाने वरेरकरांच्या कांही नाटचकृतींचें स्थूल दर्शन घडविण्याचें केलेलें कार्य म्हणूनच अभिनंदनीय ठरतें. मात्र प्रस्तुत पुस्तकाचें स्वरूप पाहतां त्याला 'नाटककार वरेरकर' हें नांव न देतां वरेरकरांचीं पांच नाटकें, हें नांव देणें अधिक योग्य झालें असतें व तें ग्रंथाचें स्वरूपहि स्पष्ट करणारें ठरलें असतें असें मला वाटतें.

प्रा. वैतुले यांच्या मार्मिक लेखणींतून वरेरकरांच्या संपूर्ण नाटचवाङ्मयावरील टीकाग्रंथ बाहेर पडावा व मराठी टीकावाङ्मयांतील एवढी उणीव भरून निघावी अशी सदिच्छा येथे व्यक्त करणें अस्थानीं होणार नाही.

व. कृ. व.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बुद्धदर्शन

[लेखक—प्रकाशक दि. मा. खैरकर—वि. वि. बनसोड, स्वस्तिक प्रकाशन, लष्करीबाग, नागपूर. पृ. ६३. किं. १ रु.]

ह्या ६३ पृष्ठांच्या चिमुकल्या पुस्तकांत गौतम बुद्धाचें जीवनचरित्र, त्यांची शिकवण, व त्यांची धर्म-निरूपणपद्धति ह्यांचें संक्षिप्त दर्शन घडविण्याचें श्रेय लेखकाने संपादन केलें आहे. सध्या बुद्धधर्मांच्या पुरस्काराची व प्रचाराची लाट भारतांत पसरली आहे. अशा सुसंधीच्या काळांत प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध झालें ही गोष्ट उचितच समजली पाहिजे. आकाराने लहान असूनहि लेखकाने मर्यादित स्वरूपांत कां होईना, अनेक प्रश्नांची त्रोटक चर्चा केलेली आहे.

ब्राह्मणांच्या यज्ञयागाचें अवडंबर फार वाढूं लागलें, समाजांत पशुहिंसा फार होऊं लागली व त्याच बरोबर वैदिक धर्माविषयीचा जिव्हाळा ओसरूं लागला. वैदिक धर्मांतील तत्त्वें सामान्य जनतेस समजण्यास कठीण होतीं, अशा परिस्थितींत त्यांना एखादा सोपा धर्म हवा होता. त्याच वेळीं गौतम बुद्धांनी अवतार घेतला व बुद्धधर्माचा प्रचार व पुरस्कार सुरूं केला इत्यादि कारणें इतिहासांतून प्रतिपादन केलीं जातात. त्यांत सत्य किती व कल्पना किती हें सांगणें अशक्य आहे. तथापि, एक गोष्ट मात्र खरी आहे की बुद्धचरित्र, बुद्धधर्म, बुद्धधर्माने घेतलेली भिन्न भिन्न वळणें, व हीं वळणें कां निर्माण झालीं इत्यादि प्रश्नांचा अभ्यास पाहिजे तितक्या सखोल पद्धतीने होत नाही. आनंदाची गोष्ट ही की गेल्या दहा—बारा वर्षांत सामान्य जनतेचें लक्ष बुद्धधर्माकडे आकर्षित होऊं लागलें. आणि कोणत्याहि हेतूने कां होईना पण राजकीय पुढाऱ्यांनी बुद्धाचें जीवनचरित्र व त्यांचें तत्त्वज्ञान ह्यांचा जोराने पुरस्कार करण्यास आरंभ केला. अशा वेळीं ह्या धर्माचें स्वरूप जितकें स्पष्ट करून सांगतां येईल तितकें हवेंच आहे. श्री. खैरकर ह्यांची आपल्या पुस्तकांत हाच प्रयत्न केला आहे.

प्रथम बुद्धाचें अल्पचरित्र देऊन नंतर त्याचीं तत्त्वें व त्यामागील भूमिका स्पष्ट करून सांगितली आहे. बुद्ध ईश्वरवादी होता की निरीश्वरवादी होता ह्याचीहि संक्षिप्त चर्चा केली आहे. बुद्धधर्माविषयी जे अनेक गैरसमज पसरले आहेत ते नाहीसे करण्याचा लेखकाने यशस्वी प्रयत्न केला आहे. पुस्तकाची भाषा सुबोध व सरळ असल्यामुळे ती सहज वाचकांच्या हृदयाला जाऊन भिडते. प्रस्तुत पुस्तक योग्य समयीं प्रसिद्ध केल्याबद्दल आणि अत्यंत स्वल्प किमतींत वाचकांना बुद्धचरित्र व त्यांचें तत्त्वज्ञान ह्यांचें दर्शन घडविल्याबद्दल लेखकाचें मनःपूर्वक अभिनंदन करावेसें वाटतें.

रा. ना. घा.

'भक्तीचा कल्पवृक्ष'

[लेखक व प्रकाशक— मा. पं. बहिरट एम्. ए., अध्यक्ष पंढरपूर संशोधक मंडळ, महाद्वार-पंढरपूर पृ. २३२ मुल्य ३ रु.]

प्रस्तुत पुस्तक म्हणजे श्री. बहिरट ह्यांनी निर. निराळ्या मासिकांतून प्रसिद्ध केलेल्या लेखांचा संग्रह होय. ह्यापूर्वी त्यांचें 'संतवाणीचा अमृत-कलश" नांवाचें अशाच स्वरूपाचें एक पुस्तक प्रसिद्ध झालेलें आहे. व त्यांवर अभिप्राय देण्याची सुसंधी ह्या अभिप्रायलेखकाला लाभली होती. (युगवाणी, सप्टेंबर १९५६) श्री. बहिरट ह्यांच्या लेखणीचे विशेष गुण कोणते ह्याचें दिग्दर्शन त्या अभिप्रायांत करण्यांत आलें होतें. हेंहि पुस्तक त्याच स्वरूपाचें असल्यामुळे विशेष कांही लिहिण्याची आवश्यकता नाही.

'अमृत-कलशा' प्रमाणे प्रस्तुत पुस्तकांतील लेख विषयाच्या मानाने त्रोटक झाले आहेत हें वाचकांच्या सहज लक्षांत येईल. श्री. बाबुराव बहिरट हे वारकरी तत्त्वज्ञान व वारकरी पंथाचे एकनिष्ठ पुरस्कर्ते असल्यामुळे त्यांच्या लेखणींतून ह्या पंथांतील संतांविषयी व त्यांच्या शिकवणींविषयी उत्कट जिव्हाळा व्यक्त झाला आहे. त्यांचें संतप्रेम इतकें ज्वाज्वल्य आहे. की लेखाचा विषय निर्भेळ सामाजिक

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असो अथवा साहित्यविषयक असो तरी त्यांत त्यांची संतभक्ति डोकावल्याखेरीज राहत नाही. मात्र ही संतभक्ति केवळ भक्तिमार्गी संतापुरतीच मर्यादित आहे. कारण भक्तिमार्ग हा इतर सर्व मार्गाहून श्रेष्ठ मार्ग आहे, हा तर बाबुरावांचा आवडता सिद्धांत आहे व तो अनेक लेखांतून व्यक्त झाला आहे.

श्री. बाबुराव बहिरट ह्यांची संतभक्ति ही जरी विशिष्ट मार्गानें अध्यात्मिक प्रवास करणाऱ्या संतांपुरती मर्यादित असली तरी त्यांचा व्यासंग मात्र मर्यादित नाही. प्रगति, समाजव्यवस्था, जडवाद, सहित्य व जीवन इत्यादि महत्वाच्या विषयांत सुद्धा त्यांची लेखणी सहज संचार करूं शकते. ह्याची कल्पना त्यांच्या या विषयावरील लेखांतून येऊं शकेल व त्यांच्या व्यासंगी स्वभावाचीहि साक्ष पटू शकेल. प्रस्तुत पुस्तकांतील 'संतवाङ्मयाभ्यासाची आधुनिक दिशा' हा लेख त्रोटक असूनहि उपयुक्त आहे. वरुण संशोधकांना मार्गदर्शनपर ठरणारा आहे. संतांचा भक्तिपंथ, ज्ञानेशांच्या विरहिणीची भूमिका, बुडतां हे जन न देखवे डोळा हे तीन लेख तर संतवाङ्मयाभ्यासी लोकांचें लक्ष वेधून घेण्याइतके सुंदर वठले आहेत.

श्री. बहिरट ह्यांचा संतविषयक अथवा वारकरीपंथविषयक वैचारिक दृष्टिकोण कित्येकांना पटेल अथवा कित्येकांना पटणार नाही, पण त्यांच्या वाणींतील उत्कट जिव्हाळा, अथवा एकनिष्ठ भक्तिप्रेम आणि त्यांची प्रसादपूरित भाषा एखाद्या नास्तिकालाहि क्षणभर आकर्षित करील इतकी प्रभावी पण गोड आहे. ह्या पुस्तकाच्या रूपानें त्यांनी मराठी वाङ्मयांत एका उत्तम पुस्तकाची भर घातली ह्याबद्दल धन्यवाद देणें हें मी कर्तव्य समजतों.

रा. ना. घा.

युद्धकालीन कथा

[ले. भा. द. खेर, जयश्री प्रकाशन, नारायण पुणे २ मू. १ रु. पृ. ७८]

सत्य हें कल्पितापेक्षा जास्त विलक्षण, अद्भुतरम्य आणि रोमांचकारी असूं शकतें ह्याचा पुरेपुर प्रत्यय खेरांच्या ह्या 'युद्धकालीन कथा' वाचतांना येतो. 'युद्धस्य कथा रम्या' ह्या न्यायानें सुद्धा ह्या कथा वाचकांना आवडतीलच. दुसऱ्या महायुद्धांत ज्या कांही लोकविलक्षण, चमत्कृतिपूर्ण घटना घडल्या त्यांपैकी कांहींचें दर्शन खेरांनी आपल्या लालित्यपूर्ण शैलीनें घडविलें आहे. कपोलकल्पित कथांपेक्षा सत्यावरच अधिष्ठित असलेल्या ह्या युद्धकथा वाचकांचें चित्त अधिक आकर्षित करून घेतील ह्यांत शंका नाही

'नेताजींचें अज्ञाताकडे महाप्रयाण' ह्यांत भीषण अशा वैमानिक अपघाताचें हृदयद्रावक असें वर्णन आलें आहे. मानवाच्या माणुसकीचा खून करणारें अमानुष आणि महाभयानक कृत्य म्हणजे हिरोशिमा व नागासाकी ह्यावर अमेरिकेनें टाकलेला 'पहिला अणुबाँब'! ह्या आसूरी वृत्तीचा आणि तत्कालीन घडलेल्या राक्षसी घटनांवर विदारक प्रकाश ह्यांनी टाकलेला आहे. मृत माणसाची अभूतपूर्व कामगिरी ह्यांत मृत माणसांचा प्रेतानें संपूर्ण युद्धाचा रंग बदलवून दोन राष्ट्रांना विजय मिळवून देण्यास तें प्रेत कसें कारणीभूत झालें ह्याचें बहारदार वर्णन त्यांत आलें आहे.

ज्या हिटलरनें एकेकाळीं आपल्या अद्भूत पराक्रमानें सर्व जग हलवून सोडलें आणि क्षणभर सर्वांना स्तिमित करून सोडलें त्याच हिटलरच्या आयुष्यांतील अखेरच्या क्षणाची, त्याच्या खाजगी वैमानिक हॅन्स बाऊर ह्यानें निवेदन केलेली हकीगत वाचून नियतीच्या अद्भुत लीलेची जाणीव होऊं लागते. आणि ही हकीगत चक्षुर्वैसत्यं असल्यानें त्यांतील उत्कटता अधिकच जाणवते.

खेरांच्या ह्या युद्धकालीन कथा वाचून वाचकांच्या मनांत दुसऱ्या महायुद्धाचा इतिहास वाचून काढण्याची उत्कंठा खास निर्माण होईल असें वाटतें.

पेशवाईंतील रत्नें

[ले. म. श्री. दीक्षित, इनामदार बंधु प्रकाशन, ९९१ सदाशिव पुणें, २; पृ. ७२ मूल्य १ रु.]

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'पेशवाईंतील रत्नें' हें नांव वाचकांची दिशाभूल करणारें आहे. कारण मानाजी फांकडा, त्रिंबकजी डेंगळे, एल्फिन्स्टन, घाशीराम कोतवाल किंवा शाहीर प्रभाकर ह्यांना पेशवाईंतील रत्नें म्हणून संबोधणें म्हणजे 'रत्न' ह्या शब्दाचा अपमान करण्यासारखें आहे.

याशिवाय लेखकाने ह्यांत ज्या व्यक्तींचें स्वभाव-चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केलेला आहे त्या सर्व व्यक्ती पेशवाईच्या उत्तरार्धातील आहेत घाशीराम कोतवाल किंवा आपल्या हाताने शनवारवाडयावर इंग्रजांचें निशाण लावणारा बाळाजी नातू हे कुप्रसिद्ध लोक रत्नांच्या मालिकेंत कसे बसूं शकतील ? ह्यांतील सर्व व्यक्ति पेशवाईच्या अंधारयुगांतील असून ह्यांना क्षणभर चकाकणाऱ्या काजव्याची सुद्धा उपमा शोभणार नाही.

आपल्या तळपत्या तरवारीचें शत्रूंना पाणी पाजून स्वपराक्रमाने मराठेशाहीला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे अनेक शूर वीर, मराठे होऊन गेलेत, अशा अनेक नररत्नांपैकी एकाचेंहि वर्णन ह्यांत नसून अप्रसिद्ध किंवा कुप्रसिद्ध व्यक्तींचें चित्रण मात्र आहे.

ज्यांच्याकडे साशंकतेने नजरा वळतात अशा व्यक्तींचा सहानुभूतीने विचार करावा अशा विचारानें उद्युक्त होऊन दीक्षितांनी ह्या व्यक्ति निवडलेल्या दिसतात. "रोचक पद्धतीने सामान्य वाचकासाठी लिहिलेली छोटीं चरित्रें" असे सुप्रसिद्ध इतिहास-संशोधक श्री. दत्तो वामन पोतदार ह्यांनी आपल्या पुरस्कारांत जे उद्‌गार काढले आहेत ते सर्वथैव योग्यच आहेत.

रा. प्र. अ.

विदर्भ साहित्य संघाचीं प्रकाशनें

१. निबंध परिमल	(निवडक मौलिक निबंधांचा संग्रह)	रु. २–४–०
२. सुमन संचय	(कविता संग्रह)	रु. १–४–०
३. मराठी गद्य	(मराठी साहित्यांतील निवडक वेचे)	रु. १–८–०
४. अंमलदार	(नाटक) लेखक–श्री. पु. ल. देशपांडे	रु. २–०–०
५. भारती	(नाटक) लेखक–श्री. नाना जोग	रु. १–८–०
६. हिंदी मराठी भाषा प्रवेशिका	लेखिका–श्रीमती मालतीबाई श्रीखंडे	रु. ०–१२–०

कै. राम गणेश गडकऱ्यांच्या साहित्यावरील अभ्यासपूर्ण प्रबंध

१. वाग्वैजयंतीचें पुनर्मूल्यन	—डॉ. मा. गो. देशमुख	रु. ०–६–०
२. नाटककार गडकरी	—श्री. द. रा. गोमकाळे	रु. ०–६–०
३. गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार	—कविभूषण अण्णासाहेब खापर्डे	रु. ०–८–०
४. गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगत	—प्रा. श्री. मा. कुळकर्णी	रु. ०–८–०
५. सतारीचे नव्हे ! एकतारीचे बोल	—श्री. द. वि. तेंडुलकर (प्रफुल्लदत्त)	रु. ०–८–०
६. गडकऱ्यांची खरी भूमिका	—प्रा. भ. श्री. पंडित	रु. ०–८–०

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, केन्द्रीय कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

(प्रा.) श्री. गो. काशीकर,
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

केंद्रवृत्त, नागपूर

(१) कार्यकारी मंडळाची सभा

रविवार दि. १४–४–९७ रोजीं सकाळीं ८–३०वाजतां कार्यकारी मंडळाची सभा भरली. त्या बैठकींत पुढील निर्णय घेण्यांत आले—

(१) कै. पु. मं. लाड यांच्या मृत्यूबद्दल दुखवटयाचा ठराव करण्यांत आला.

(२) १९९६–९७ सालचें कार्यवृत्त व तपासनिसांनी तपासलेले हिशेब मंजूर करण्यांत आले.

(३) परीक्षा समितीने अभ्यासक्रमांत केलेला बदल व शुल्कांत केलेली वाढ यांना मंजुरी देण्यांत आली.

(४) १९९७–९८ सालाकरिता पुढीलप्रमाणे समित्या नियुक्त करण्यांत आल्या. प्रत्येक समितीवर अध्यक्ष व सरचिटणीस हे पदसिद्ध सभासद राहतील. अन्य उल्लेख नसल्यास संघाध्यक्ष हेच समित्यांचे अध्यक्ष राहतील. फक्त अर्थ समितीवर अध्यक्ष राहणार नाहीत.

१. निविदा व प्रकाशन समिति : आमंत्रक : सरचिटणीस; सभासद : अध्यक्ष, कोषाध्यक्ष, संपादक व संचालक.

२. पुस्तकालय समिति—आमंत्रक : श्री. पां. बा. गडकरी; सभासद श्री. ग. नी. भवाळकर, डॉ. वि. भि. कोलते, श्री. तु. वि. गेडाम.

३. मंदिर समिति—कार्यवाह : श्री. नानासाहेब जोग.

४. परीक्षा समिति—संचालक : श्री. रा. पु. सगदेव.

५. गडकरी स्मारक समिति—कार्यवाह : श्री. पां. बा. गडकरी.

६. सांस्कृतिक समिति—आमंत्रक : श्री. द. रा. गोमकाळे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

७. कै. हरिभाऊ नेने-स्मारक ग्रंथ समिति—आमंत्रक : श्री. श्री. गो. कांशीकर; सभासद : म. म. मिराशी, श्री. बाळासाहेब ढवळे, श्री. ना. रा. शेंडे, डॉ. वि. भि. कोळते, सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, प्रा. पां. कृ. सावळापूरकर, श्री. दे. गो. लांडगे, श्री. सु. म. डोळके, डॉ. मा. गो. देशमुख.

८. अर्थ समिति—आमंत्रक : कोषाध्यक्ष; सभासद : उपाध्यक्ष, सरचिटणीस, संचालक व आमंत्रक, सांस्कृतिक समिति.

९ नियुक्ति समिति—आमंत्रक : सरचिटणीस, सभासद : अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक व श्री. ल. वि. पांढरीपांडे.

वरीलपैकी ज्या समित्यांचे केवळ एकेक पदाधिकारी नियुक्त केले आहेत त्यांवर इतर सभासद नेमण्याचा व वर उल्लिखित नसलेल्या समित्या नियुक्त करण्याचा अधिकार अध्यक्ष व सरचिटणीस यांना देण्यांत आला.

(५) परीक्षा समितीचें कार्यालय मुख्य कार्यालयांत विलीन करावें असें ठरलें.

(६) कोषाध्यक्षांच्या अनुपस्थितींत सरचिटणीसांनी १९५७–५८ चें अंदाजपत्रक सादर केलें. त्यांत किरकोळ बदल करून ते मंजूर करण्यांत आलें.

(७) वेतन समितीच्या शिफारशी लक्षांत घेऊन कार्यकारी मंडळाने दि. २८–१०–५६ ला केलेल्या कर्मचारी नियमांपैकी वेतनश्रेणी रद्द करण्याचें ठरलें. तसेंच १-५-५७ पासून श्री. येगांवकर यांना रु. ८ व श्री. कृष्णराव मांडे यांस रु. १ वेतनवाढ द्यावी असें ठरलें. श्री. येगांवकर यांचा रजेच्या पगाराचा अर्जहि मंजूर करण्यांत आला.

(८) कार्यालयास आषाढ़ी एकादशी व अक्षयतृतीया ह्या सुटया देऊन इतर सुट्टयांचा विचार पुढील बैठकींत करावा असें ठरलें.

(९) श्रीमती रमाबाई केदार यांनी कै० टी. जे. केदार यांच्या विद्वत्ताप्रचुर व संशोधनात्मक लेखांचा संग्रह प्रसिद्धीकरितां वि. सा. संघास दिला त्याचा आभारपूर्वक स्वीकार करण्यांत आला.

(१०) चालू वर्षी वि. सा. संघाचे वतीने १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाची शताब्दि साजरी करावी असें ठरलें.

(२) प्रतिनिधि नियुक्ति

यूनेस्कोच्या नॅशनल कमिशन फॉर कोऑपरेशन वर वि. सा. संघाचे प्रतिनिधि म्हणून श्री. आ. रा. देशपांडे यांची तीन वर्षांकरितां अध्यक्षांनी नियुक्ति केली.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(३) आजीव सभासद

श्री. यशवंत मोरेश्वर मराठे, नागपूर.

(४) वार्षिक साधारण सभा

दि. २१-४-५७ रोजीं वि. सा. संघाची केंद्रीय वार्षिक सर्वसाधारण सभा वि. सा. संघाच्या कार्यालयांत दुपारीं ४-३० वाजतां भरली. त्या सभेंत पुढील विषय मंजूर करण्यांत आले.

१. गतवर्षाचें कार्यवृत्त
२. गतवर्षाचे हिशेब.
३. १९५७-५८ चें अंदाजपत्रक.
४. १९५७-५८ करिता अधिकृत हिशेबतपासनिस म्हणून महेश्वर गद्रे आणि कंपनी यांची नेमणूक करण्यांत आली.

(५) गडकरी स्मारक समिति

१९५७-५८ करिता पुढीलप्रमाणे नियुक्ति करण्यांत आली—

अध्यक्ष--श्री. न्या. मू. वा. रा. पुराणिक; कार्याध्यक्ष—कु. ताराबाई प्रधान; कार्यवाह—श्री. पां बा. गडकरी; सभासद--श्री. द. रा. गोमकाळे; श्री. रा. पु. सगदेव, श्री. र. वि. कुळकर्णी, श्री. श्री. वि. गंधे, सौ. इंदुमति गंधे, सौ. उषाताई कोल्हते, श्रीमती पद्मावतीबाई चिटणीस, सौ. मालतीबाई प्रधान, श्री. बाबुराव चिमोटे, श्री. ना. रा शेंडे.

(६) निविदा समिति

दि. १७-४-५७ ला निविदा प्रकाशन समितीची बैठक होऊन १९५७-५८ साला-करिता युगवाणी छपाईबद्दल नारायण मुद्रणालय यांजकडील निविदा मंजूर झाली.

(७) देणगी

श्रीमती रमाबाई केदार यांनी हस्तलिखितें २२, पुस्तकें व पंचांगें मिळून ११० व कालिदास आणि वेदस्थान ऑफ एन्शन्ट होम या दोन पुस्तकांच्या १०६ प्रति देऊन वि. सा. संघास उपकृत केलें आहे.

(८) माननीयांच्या भेटी

दि. ५-४-५७ रोजीं न्या. मू. श्री. दिक्षित व न्या. मू. श्री. गोखले यांनी वि. सा. संघास सायंकाळीं ५॥ वाजतां भेट दिली. ह्या प्रसंगीं श्री. नानासाहेब जोग यांनी रंगमंदिराची

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माहिती दिली व श्री. गोमकाळे यांनी सर्वांचा परिचय करून दिला. प्रा. काशीकर यांनी स्वागत केल्यानंतर न्या. मू. दिक्षित यांचें भाषण झालें.

भारत शासनाने नेमलेल्या संस्कृत आयोगाचे सदस्य पश्चिम बंगाल विधान परिषदेचे अध्यक्ष, डॉ. सुनीतिकुमार चटर्जी, मुंबई भारतीय विद्याभवनाचे संचालक श्री. जे. एच. देव, मद्रास विद्यापीठाचे प्रा. व्ही. राघवन् व पुणें संस्कृत विद्यापीठाचे प्रा. आर. एन्. दांडेकर यांनी दि.२९-४-५७ ला सायंकाळीं वि. सा. संघास भेट दिली. ह्यावेळीं म. म. मिराशी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. व श्री. नानासाहेब जोग यांनी त्यांना रंगमंदिराची माहिती दिली. सरचिटणीस प्रा. श्री. गो. कांशीकर यांनी संस्कृत भार्षेत भाषण करून पाहुण्यांचें स्वागत केलें. त्यानंतर प्रा. राघवन् यांनी उत्तरादाखल संस्कृतमध्येच भाषण केलें व वि. सा. संघाच्या कार्याबद्दल प्रशंसोद्गार काढले. चहापान होऊन हा रोचक कार्यक्रम संपला.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ

इ. स. १९५६–५७ चें कार्यवृत्त

कार्यकारी मंडळाच्या बठकी व साधारण सभा

ह्या वर्षापासून नवीन घटनेनुसार ३ वर्षांकरिता कार्यकारी मंडळ निवडून आलें. या वर्षात कार्यकारी मंडळाच्या एकूण ८ बैठकी झाल्या आणि सर्वसाधारण सभेच्या २ बैठकी झाल्या. संघाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांच्या सुयोग्य मार्गदर्शनाखाली कार्यकारी मंडळ व साधारण सभा ह्यांचीं कामें जास्तीत जास्त सलोख्याने व सहकार्याने पार पडलीं.

वि. सा. संघाचे सभासद

१९५६–५७ मध्ये पटावर एकूण वर्गणीदार सभासद ७७६ होते. ह्यांपैकी १४९ जुने आजीव सभासद असून १४ आजीव सभासद व १ हितचिंतक १९५६–५७ मध्ये झाले आहेत.

समित्यांचें कार्य

विदर्भ साहित्य संघाचें कार्य मुख्यतः निरनिराळया समित्यांच्या द्वारें चालतें. १९५६–५७ मध्ये निरनिराळया समित्यांनी अत्यंत उत्साहाने भरीव कार्य केलें आहे.

मंदिर समिति – ह्यावर्षीं मंदिरनिधि व मंदिररचना समिति या दोहोंची एकच समिति करण्यांत आली. रंगमंदिराचें बांधकामाला एकूण ३ लाख रुपये खर्च येणार आहे. त्यांपैकी जवळ जवळ १ लाख रुपयांचें बांधकाम ह्यावर्षीं पूर्ण करण्यांत आलें. रंगमंदिराच्या बांधकामाचा मुहूर्त समारंभ वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर दि. १२–४–५६ रोजीं जुन्या मध्यप्रदेशाचे स्थानिक स्वराज्यमंत्री श्री. पु. का. देशमुख ह्यांचे हस्तें पार पडला. तसेंच रंगमंदिराचा कोनशिला समारंभ दि. १८–१०–५६ रोजीं भारताचे माजी अर्थमंत्री व विश्वविद्यालयीन अनुदान आयोगाचे अध्यक्ष श्री. चिं. द्वा. देशमुख यांचे हस्तें झाला.

या मंदिरांत १००० प्रेक्षकांची बसण्याची सोय होणार असून यांतील पडदे व देखावे न गुंडाळतां जसेच्या तसे वर जातील किंवा खाली येतील, येवढें हें मंदिर विस्तृत राहणार आहे.

यांतील रंगपीठ रुळावर सरकतें राहणार असून ५ सेकंदाच्या आंत एक देखावा सरकवून दुसरा देखावा त्या ठिकाणीं आणतां येईल. रंगपीठावर मोटार देखील प्रत्यक्षपणें येऊं शकेल इतकें तें अद्ययावत्

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साधनांनी सुसज्ज राहणार आहे. मंदिर समितीचे कार्यवाह श्री. नानासाहेब जोग ह्यांच्या अविश्रांत परिश्रमामुळेच रंगमंदिराचें स्वप्न साकार होत आहे.

नाट्यसमितिः—या समितीद्वारा पुढील कार्यक्रम आयोजित करण्यांत आले.

दि. २९-८-५६ रोजीं नाट्याचार्य कृ. प्र. खाडिलकर स्मृतिदिन व दि. २४-९-५६ रोजीं संगीत-कलानिधि मा. कृष्णराव फुलंब्रीकर यांचें 'कथानकाशीं समरस संगीत' या विषयावर प्रात्यक्षिकासह व्याख्यान.

तसेंच ह्यावर्षी विशाल प्रमाणावर 'नाट्य महोत्सवा'चें आयोजन करण्यांत येऊन एक अत्यंत स्पृहणीय कार्यक्रम नाट्यसमितीने, नाट्यसमितीचे आमंत्रक श्री. द. रा. गोमकाळे यांचे नेतृत्वाखाली सुरू केला आहे. दि. ७-११-५६ रोजीं नाट्यमहोत्सव सुरू करण्यांत आला. या समारंभाचें अध्यक्षस्थान नटवर्य श्री. केशवराव दाते यांना देण्यांत आले होते. या समारंभांत ७-११-५६ ते १३-११-५६ पर्यंत पुढीलप्रमाणे नाट्यप्रयोगांचें आयोजन करण्यांत आलें होतें.

(१) दि. ७-११-५६ : 'यशवंत कलाकेन्द्र' (नागपूर) तर्फे "संगीत मानापमान"
(२) दि. ८-११-५६ : मुंबई मराठी साहित्यसंघातर्फे 'होनाजी बाळा'
(३) दि. ९-११-५६ : नागपूर नाट्यमंडळातर्फे 'आंधळ्यांची शाळा'
(४) दि. ११-११-५६ : अभिनव नाट्यमंदिर, (नागपूर) तर्फे 'राणीचा बाग'
(५) दि. १२-११-५६ : सारस्वत नाट्यमंडळ, (नागपूर) तर्फे 'उद्यांचा संसार'

दि. १३-११-५६ रोजीं नाट्यमहोत्सवाचा समारोप, मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाण यांच्या हस्तें झाला. ह्याच दिवशीं रात्री १० वाजतां नागपूर महाविद्यालयातर्फे नाट्यस्पर्धेत उत्कृष्ट ठरलेल्या 'खडाष्टक' नाटकाचा प्रयोग झाला.

ह्या महोत्सवांत महाविद्यालयीन नाट्यस्पर्धाहि ठेवण्यांत आली होती. ह्या स्पर्धेत नागपूर महाविद्यालय, वैद्यक महाविद्यालय, शेतकी महाविद्यालय, वाणिज्य महाविद्यालय, नॅशनल महाविद्यालय, व हिस्लॉप महाविद्यालय, यांनी भाग घेतला. ह्या स्पर्धेकरिता श्री. मनोहरराव खोलकुटे यांनी आपले वडील श्री. बाबासाहेब यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त एक भव्य व आकर्षक फिरती ढाल देऊन विदर्भ साहित्य संघास उपकृत केलें आहे ह्या वर्षीच्या नाट्यस्पर्धेत 'नागपूर महाविद्यालया'ने उच्चांक गाठून ही 'श्री खोलकुटे ढाल' मिळविली.

ह्या नाट्यमहोत्सवाकरिता 'सहकारी नाट्योत्सव समिति' स्थापन करण्यांत आली. ह्या समितीचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब अण्णेगिरी, उपाध्यक्ष सौ. सुशीलाबाई वैरामजी व समितीचे सचीव श्री. द. रा. गोमकाळे यांनी अत्यंत परिश्रम घेऊन नाट्यमहोत्सव यशस्वी केला.

परीक्षा समिति—ह्या वर्षी भिन्न भिन्न परीक्षांना पुढीलप्रमाणे ३७९१ परीक्षार्थी बसले.

सत्र	प्रवेश	प्रारंभ	विनीत	परीचित	स्नातक	पारंगत	एकूण परीक्षार्थी	केंद्रें
१ ऑगस्ट ५६	८६	४८६	८१४	१६१	९२	×	१६३९	५५
२ जानेवारी ५७	१३६	५७४	१११८	२०५	१००	१९	२१५२	६३

या दोन्ही सत्रांत पुढील परीक्षार्थींना बक्षिसें मिळालीं--

(१) डॉ. शिंगाणापूरकर सुवर्णपदक सौ. शांताबाई सदाशिवराव दंडिगे, नागपूर.

(२) कै. प्रा. ना. कृ. दिवाणजी पारितोषिक--(१) श्री. के. न. खोडे, देऊरवाडा व (२) श्री. रा. व्यं. महल्ले, मोर्शी.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या वर्षी परीक्षा समितीने 'उपाधिकारी शाल समारंभ' हा अभिनव कार्यक्रम दि. २२-७-५६ रोजीं नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु व विदर्भ साहित्य संघाचे कार्यकारी विश्वस्त न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ति यांच्या अध्यक्षतेखाली घडवून आणला. ह्यावेळीं एकूण १०० उपाधिधाऱ्यांना प्रत्येकी शाल व उपाधिधारी प्रमाणपत्र देण्यांत आलें. तसेंच त्याच दिवशीं उपाधिधारी संमेलनहि भरविण्यांत आलें. हा अभिनव शालवितरणाचा समारंभ तत्कालीन संचालक प्रा. माणिक के. बैतुले यांच्याच परिश्रमाने पार पडला.

सांस्कृतिक कार्यक्रम समिति—सांस्कृतिक कार्यक्रम समितीने यावर्षी पुढीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित केले—

१७ मे १९५६ रोजीं आचार्य बाळशास्त्री जांभेकर पुण्यतिथि साजरी करण्यांत आली. याप्रसंगीं प्रा. अ. ना. देशपांडे यांचें व्याख्यान झालें.

२१ मे १९५६ रोजीं श्रीशंकराचार्य जयंती साजरी करण्यांत आली. यावेळीं साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांचें व्याख्यान झालें.

२४ मे १९५६ रोजीं बुद्धजयंती साजरी करण्यांत आली. यावेळीं म. म. वा. वि. मिराशी यांचें व्याख्यान झालें.

प्राध्यापकीय व्याख्यानमाला—यांत पुढीलप्रमाणे पांच व्याख्यानें झालीं.

१. दि. १८-८-५६ रोजीं "डॉ. केतकर आणि त्यांचें समाजशास्त्र" यावर प्रा. अ. ना. देशपांडे यांचें व्याख्यान.
२. दि. २२-८-५६ रोजीं "डॉ. केतकरांच्या कादंबऱ्या" यावर प्रा. भा. श्री. परांजपे यांचें व्याख्यान.
३. दि. ३०-८-५६ रोजीं "प्रा. फडक्यांची कला" या विषयावर प्रा. श्री. मा. कुळकर्णी यांचें व्याख्यान.
४. दि. १-९-५६ रोजीं "मृच्छकटिक" या विषयावर प्रा. श्री. भा. वर्णेकर यांचें व्याख्यान.
५. दि. २८-११-५६ रोजीं "Three Immodest plays" या विषयावर प्रा. व्यं. रा. वनमाली यांचें व्याख्यान. ह्यावेळीं सभाध्यक्ष प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांनी व्याख्यानमालेचा समारोप केला.

महाराष्ट्रदर्शन' व्याख्यानमाला—या कालोचित व्याख्यानमालेंत पुढीलप्रमाणे चार व्याख्यानें झालीं.

१. दि. २१-१०-५६ रोजीं 'महाराष्ट्राची संस्कृति' या विषयावर साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांचें व्याख्यान.
२. दि. २३-१०-५६ रोजीं 'महाराष्ट्राची अर्थव्यवस्था' या विषयावर प्रा. म अ. चान्सरकर यांचें व्याख्यान.
३. दि. २६-१०-५६ रोजीं 'संतांचें महाराष्ट्राला वरदान' या विषयावर सौ. शांताबाई गोखले, पुणें, यांचें व्याख्यान.
४. दि. २६-११-५६ रोजीं 'आजच्या महाराष्ट्रांतील सामाजिक सुधारणेचें स्वरूप व आवश्यकता' या विषयावर आचार्य बाबुराव जगताप, पुणें यांचें व्याख्यान.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्यिक व्याख्यानमाला—

(१) 'संस्कृत साहित्यशास्त्रांतील सौंदर्यविचार' या विषयावर दि. २९ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर ५६ पर्यंत अमरावती येथील विद्वान् प्राध्यापक श्री. ग. त्र्यं. देशपांडे यांचीं व्याख्यानें झालीं.

(२) महाराष्ट्राच्या सुप्रसिद्ध कादंबरीकार सौ. मालतीबाई बेडेकर यांचीं व्याख्यानें दि. १० व ११ नोव्हेंबर ५६ रोजीं, अनुक्रमें 'कादंबरीची निर्मिती' व 'आपलें मराठी बालवाङ्मय' या दोन विषयावर झालीं.

(३) प्रा. ना. सी. फडके यांनी दि. १ ते ३ डिसेंबर ५६ पर्यंत अनुक्रमें 'ललित साहित्याची कसोटी,' 'ललित साहित्याची शक्ति आणि मर्यादा' व 'कादंबरीचें स्वरूप आणि तंत्र' या विषयांवर भाषणें दिलीं.

इतर कार्यक्रम

दि. २२-६-५६ रोजीं भारतसरकारचे सिनियर सायकॉलॉजिस्ट श्री. नि. र. उर्फ वसंतराव वऱ्हाडपांडे, दिल्ली, यांचें 'साहित्याचीं मूल्यें' या विषयावर व्याख्यान.

दि. २-७-५३ रोजीं मराठवाड्याचे सुप्रसिद्ध कवि श्री. दे. ल. महाजन यांचा सत्कार.

दि. २२-३-५६ रोजीं, अमेरिकेहून आलेल्या सौ. आर्मस्टाँग व श्रीमती प्रधान याचें स्वागत.

दि. २० व २१ जानेवारी ५७ ला महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध विद्वान श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची, 'ध्येयवादाचा संगर' आणि 'वस्तुस्थिति व ध्येयवाद' या विषयांवर भाषणें.

दि. २२-१-५७ ला शैक्षणिक व आध्यात्मिक क्षेत्रांतील प्रसिद्ध कार्यकर्ते व तत्त्वचिंतक श्री. ज. मा. उर्फ भय्यासाहेब कायंदे यांचें 'महर्षि अरविंदांचें वाङ्मय' या विषयावर व्याख्यान.

अशा प्रकारें विविध कार्यक्रम झाले. समितीचे आमंत्रक श्री. रा. पु. सगदेव यांच्या परिश्रमाने सांस्कृतिक कार्यक्रम समितीने या वर्षी कार्यक्रमांचे बाबतींत उच्चांक गाठला.

युगवाणी समिति—ह्या वर्षी प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांच्या संपादकत्वाखाली युगवाणी-मध्ये वैचारिक लेखांना प्राधान्य देण्यांत आलें. यंदा 'टिळक-आगरकर जन्मशताब्दि विशेषांक,' 'दीपावलि विशेषांक,' 'संमेलन विशेषांक' आणि 'ललित साहित्य विशेषांक' असे चार विशेषांक काढण्यांत आले. ललित साहित्य विशेषांकाचें संपादनकार्य प्रा. मा. ल. व्यवहारे यांनी केलें.

गडकरी स्मारक समिति—गडकरी स्मारक समितीच्या वतीने कै. राम गणेश गडकरी यांचा ३८ वा स्मृतिदिन दि. २२ आणि २३ जानेवारी ५७ रोजीं तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यांत आला. पहिलें दिवशीं कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि कै. राम गणेश गडकरी यांच्या प्रतिमांचें अनावरण करण्यांत आलें. त्या प्रसंगीं सुप्रसिद्ध कवि प्रा. भ. श्री. पंडित ह्यांनी 'गडकऱ्यांची खरी भूमिका' ह्या प्रबंधाचें वाचन केलें. हा प्रबंध पुस्तिकेच्या रूपाने प्रसिद्ध करण्यांत आला आहे. दुसरे दिवशीं प्रतिमापूजन होऊन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचें 'गडकऱ्यांची सिंधू' या विषयावर विचारपरिप्लुत भाषण झालें. या वेळचें तर्कतीर्थांचें भाषण महाराष्ट्रभर गाजलें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कै. कोल्हटकर यांची प्रतिमा वि. सा. संघास देऊन वि. सा. संघाचे पूर्वाध्यक्ष आणि महाराष्ट्रांतील प्रथितयश कादंबरीकार व वृत्तपत्रकार श्री. ग. त्र्यं. उर्फ भाऊसाहेब माडखोलकर यांनी वि. सा. संघास उपकृत केलें आहे.

पुस्तकालय समिति--ह्या वर्षी पुस्तकालय समितीने नाट्यवाङ्मय व कांही दुर्मिळ ग्रंथांचा संग्रह केला. तसेंच सभासदांना पुस्तकें देण्यासंबंधीची योजनाहि आखण्यांत आली. दर वर्षीप्रमाणेच यंदाहि वृत्तपत्रें व मासिकें ह्यांचें वाचनालय सायंकाळीं कार्यालयांत सर्वांकरितां खुलें ठेवण्यांत आलें. ह्या वर्षी पुस्तकालयाला श्रीमती रमाबाई केदार यांनी कै. डॉ. टी. जे. केदार यांच्या स्मरणार्थ २०० ग्रंथ दिले. ग्रंथांचा प्रदानसमारंभ दि. ३०-३-५७ रोजीं झाला. श्री. जी. डब्ल्यु. चिपळूणकर व श्री. नानासाहेब सरदेसाई यांनीहि ग्रंथ देऊन उपकृत केलें.

कै. हरिभाऊ नेने स्मृति ग्रंथ समिति--विदर्भ साहित्य संघाचे पूर्वाध्यक्ष व एक थोर व्यासंगी संशोधक कै. ह. ना. नेने ह्यांच्या संशोधनात्मक लेखांचा ग्रंथ प्रकाशित करण्याचे दृष्टीने म. म. वा. वि. मिराशी यांचे अध्यक्षतेखाली यावर्षी एक समिति स्थापन करण्यांत आली. समितीने ग्रंथ प्रकाशनाची योजना आखली असून त्या दृष्टीने कार्याला सुरुवात झाली आहे.

टिळक आगरकर जन्मशताब्दी महोत्सव

वि. सा. संघाच्या वतीने मराठी पंचांगानुसार दि. १९ जुलै ५६ रोजीं कै. प्रिं. आगरकर आणि दि. २९ जुलै ५६ रोजीं कै. लोकमान्य टिळक या दोन थोर पुरुषांची जन्मशताब्दि त्यांच्या तैलचित्रांच्या अनावरण समारंभाने साजरी करण्यांत आली. या प्रसंगीं दि. १९ जुलै ते १ ऑगस्ट ५६ पर्यंत पुढील-प्रमाणे विविध कार्यक्रमांचें आयोजन करण्यांत आलें.

दि. १९-७-५६ रोजीं पुणें विद्यापीठाचे कुलगुरु रँगलर डॉ. रा. पु. परांजपे यांचें हस्तें कै. प्रिं. आगरकरांच्या तैलचित्राचें अनावरण.

दि. २०-७-५६ ला सौ. विमलाबाई देशपांडे यांचें 'आगरकरांची समाजसुधारणेची अपेक्षा व तिची फलश्रुति' या विषयावर भाषण.

दि. २१-७-५६ ला प्रा. सौ. मनुताई नातू, अमरावती, यांचें 'आगरकरांचा बुद्धिवाद' या विषयावर व्याख्यान.

दि. २२-७-५६ ला परीक्षा समितीचा 'उपाधिधारी शालवितरण समारंभ' व संमेलनाचा कार्यक्रम या महोत्सवाच्या अंतर्गत करण्यांत आला.

दि. २६ ते २८ पर्यंत बडोद्याचे सुप्रसिद्ध संशोधक श्री. (आता कै.) दाजी नागेश आपटे यांचीं 'लोकमान्य टिळकांचें संशोधनकार्य' या विषयावर विद्वत्ताप्रचुर भाषणें.

दि. २९ ला बिहारचे माजी राज्यपाल व वि. सा. संघाचे विश्वस्त लोकनायक डॉ. मा. श्री. ऊर्फ बापूजी अणे यांच्या हस्तें कै. लोकमान्य टिळक यांच्या तैलचित्राचें अनावरण.

या महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या निबंधस्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ ह्याच वेळीं लोकनायकांच्या हस्तें करण्यांत आला.

दि. ३० ला प्रा. श्री. गो. काशीकर यांचें 'लो. टिळकांचें राजकारण' या विषयावर भाषण.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दि. ३१ ला प्रा. श्री. भा. वर्णेकर यांचें 'राष्ट्रवादी लोकमान्य' या विषयावर संस्कृतांत भाषण.

दि. १-८-५६ ला वि. सा. संघाचे पूर्वाध्यक्ष व महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. शं. दा. पेंडसे यांनी महोत्सवाचा समारोप केला. या वेळीं त्यांचें 'लोकमान्यांचें तत्त्वज्ञान' या विषयांवर अभ्यासपूर्ण व्याख्यान झालें.

या महोत्सवाप्रीत्यर्थ महाविद्यालयीन व उच्च-माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांकरितां लो. टिळक व कै. आगरकर ह्यांच्या कार्यासंबंधीं व तत्त्वज्ञानासंबंधीं निबंधस्पर्धा ठेवण्यांत आली होती. या स्पर्धेत एकूण ३६ विद्यार्थी व विद्यार्थिनींनी भाग घेतला होता. स्पर्धेत पुढीलप्रमाणें बक्षिसें देण्यांत आलीं:—

लोकमान्य टिळकांविषयीचे निबंध

(अ) महाविद्यालयीन पारितोषिक	(१) श्री. दा. ना. आसमवार	रु. ५०
	(२) श्री. मधुकर दक्षिणदास	रु. २५
(ब) शालेय पारितोषिक	(१) श्री. मा. ग. सरपटवार, वणी	रु. २५
	(२) कु. सुषमा परांजपे, नागपूर	रु. १५

आगरकरांविषयीचे निबंध

(अ) महाविद्यालयीन पारितोषिक	(१) श्री. राजेंद्र बनहट्टी	रु. ५०
	(२) श्री. शरद् कळणावत	रु. २५
(ब) शालेय पारितोषिक	(१) कु. शकुंतला बनहट्टी	रु. २५
	(२) श्री. प्र. ना. मुजुमदार	रु. १५

स्पर्धेतील निबंध तपासण्याचें परीक्षकाचें कार्य श्री. भाऊसाहेब माडखोलकर व सौ. विमलाबाई देशपांडे यांनी करून संघास उपकृत केलें.

कै. नेने स्मृतिदिन

दिनांक २१-११-५६ रोजीं वि. सा. संघातर्फे कै. हरिभाऊ नेने स्मृतिदिनाचा कार्यक्रम झाला. त्या वेळीं म. म. वा. वि. मिराशी व संघाचे उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचीं भाषणें झालीं.

स्वागत-सन्मान आणि भेटी

वि. सा. संघातर्फे दि. १३-४-५६ रोजीं सागर विद्यापीठाचे नवे कुलगुरु पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांचा सन्मान करण्यांत आला.

दि. २२-६-५६ रोजीं भारत सरकारच्या आकाशवाणी व वार्ता खात्याचे मंत्री डॉ. बाळकृष्ण केसकर यांनी संघास भेट दिली.

दिनांक ५-८-५६ रोजीं श्रीमान् शेठ दुर्गाप्रसादजी सराफ यांनी संघास भेट दिली.

नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु व वि. सा. संघाचे कार्यकारी विश्वस्त श्री. न्या. मू. के. तु. ऊर्फ अण्णासाहेब मंगळमूर्ति यांच्या षष्ट्यब्दिपूर्तिनिमित्त दि. ११-१-५७ रोजीं सत्कार समारंभ करण्यांत आला. या प्रसंगीं श्री. बाळासाहेब ढवळे, प्रा. श्री. गो. काशीकर, लोकनायक बापूजी अणे व श्री. य. गो. मालेदे यांचीं भाषणें झालीं.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भारत सरकारच्या वार्ता व नभोवाणी खात्याचे सचिव श्री. (आता कै.) पु. मं. लाड यांनी दि. ७-१-५७ ला वि. सा. संघास भेट दिली.

साहित्या अकादमीच्या मराठी सल्लागार समितीचे सदस्य श्री. मामा वरेरकर, म. म. दत्तो वामन पोतदार, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, डॉ. ना. गो. नांदापुरकर, सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, व श्री. प्रभाकर माचवे ह्यांचें संघातर्फे दि. २३-१-५७ ला स्वागत करण्यांत आलें.

शाखावृत्त

रामटेक, गोंदिया, भंडारा, तुमसर, चांदा, हिंगणघाट, अमरावती आणि खामगांव ह्या वि. सा. संघाच्या जुन्या शाखा असून पुसद व यवतमाळ या ठिकाणीं ह्या वर्षी नवीन शाखा स्थापन करण्यांत आल्या आहेत.

(१) पुसद—वि. सा. संघाचे चिटणीस श्री. य. गो. मालोदे व पुसद येथील श्री. जकाते वकील, श्री. आबासाहेब पल्लेवार वकील, श्री. भा. श्री. केसकर आणि इतर कार्यकर्ते यांच्या परिश्रमाने पुसद येथे शाखा स्थापन करण्यांत आली. शाखेचा उद्घाटनसमारंभ दि. १८-११-५६ लां कोषटवार विद्यालयांत करण्यांत आला. यावेळीं वि. सा. संघाचे सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांनी उद्घाटनाचें भाषण केलें. शाखाध्यक्ष श्री. ज. व्यं. पल्लेवार व चिटणीस श्री. भा. श्री. केसकर ह्यांचींहि भाषणें झालीं.

(२) यवतमाळ—श्री. दि. य. महाजन व श्री. य. गो. मालोदे यांच्या परिश्रमाने यवतमाळ येथेहि ह्यावर्षी शाखा स्थापन करण्यांत आली.

(३) अमरावती—अमरावती शाखेची वार्षिक सभा दि. १८-८-५६ रोजीं प्रा. कृ. व्यं. पेशकार यांचे अध्यक्षतेखाली भरून तींत १९५६-५७ करितां कार्यकारी मंडळ निवडण्यांत आलें. ह्यावर्षी 'नवरात्र' व्याख्यानमाला आयोजित केली गेली. तींत डॉ. मा. गो. देशमुख, डॉ. अत्तरदे, प्रा. ग. त्र्यं. देशपांडे, प्रा. भ. प्र. मोहरीर, प्रा. मनूताई नातू इत्यादि वक्त्यांचीं व्याख्यानें झालीं. शाखेचा वार्षिकोत्सव समारंभ लोकनायक डॉ. माधव श्रीहरि उर्फ बापूजी अणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. ह्या महोत्सवांत दि. २३-२-५७ ला 'प्राचीन मराठी कवींच्या ग्रंथांचें उपसंहार' हा परिसंवाद झाला. १ श्री. वा. ख. पेंढारकर, २ श्री द. ह. अग्निहोत्री, ३ डॉ. मा. गो. देशमुख, ४ श्री. ह. वा. देशमुख, ५ प्रा. कृ. व्यं. पेशकार व ६ श्री. अ. स. पाध्ये यांचीं अनुक्रमें ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर, रामदास, मोरोपंत व तुकाराम ह्या कवींवर भाषणें झालीं. दि. २४-२-५७ ला सकाळीं डॉ. जोशी सभागृहांत मुख्य समारंभ झाला. ह्या वेळीं लो. ना. डॉ. बापूजी अणे याचें भाषण झालें. दुपारीं साहित्यविषयक अनौपचारिक चर्चा व नव्या जुन्या सभासदांचें संमेलन झालें. रात्रौ कविभूषण अण्णासाहेब खापर्डे, श्री. मधुकर केचे, श्री. वसंत पेंढारकर, श्री. मनोहर वऱ्हाडपांडे, प्रा. भ. प्र. मोहरीर, सौ. सुनंदा पांडे, श्री. राम शेवाळकर, व श्री. बाबा मोहोड या कवींचें काव्यगायन झालें. शेवटीं मनोरंजनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमाने हा महोत्सव संपला.

शाखेचे अध्यक्ष श्री. ह. वा. देशपांडे, चिटणीस श्री. पु. रा. पारनेरकर, व अन्य कार्यकर्त्यांनी महोत्सवाकरिता बरेच श्रम घेतले.

(४) चांदा:—दि. ७-१०-५६ ला पू. लो. ना. बापूजी अणे यांनी चांदा येथील वि. सा. संघाच्या गोंडवन शाखेला भेट दिली. ह्या वेळीं श्री. अ. ज. राजूरकरकृत "चंद्रपूरचा इतिहास" व श्री. भगवतीप्रसाद मिश्रकृत "बुद्ध और गांधी" ह्या दोन पुस्तकांचें प्रकाशन त्यांचे हस्तें करण्यांत आलें. ह्या वेळीं लो. ना. बापूजी अणे यांचें भाषणहि झालें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दि. २३-१-५७ ला कै. गडकरी स्मृतिदिन साजरा करण्यांत आला. शाखाध्यक्ष श्री. गो. वा. पुल्लीवार हे अध्यक्षस्थानीं होते. ह्या वेळीं श्री. गं. ना. वैरागडे यांचें 'गडकऱ्यांची काव्यसृष्टि', श्री. न. रा. निमजे यांचें 'गडकऱ्यांचा विनोद' व श्री. दे. मा. ओक यांचें 'गडकऱ्यांच्या मानसकन्या' ह्या विषयांवर भाषणें झालीं.

(५) गोंदियाः—दि. ३०-९-५६ ला शाखाध्यक्ष श्री. छोटुसाभाई क्षत्रिय यांचे अध्यक्षतेखाली नूतन निर्वाचित नगराध्यक्ष श्रीमान् मनोहरभाई पटेल यांचा सत्कार करण्यांत आला. ह्या वेळीं श्री. तेलंग वकील, श्री. छोटूसाभाई क्षत्रिय व श्री. बा. का. देशमुख वकील यांचीं भाषणें झालीं. दि. १४-१०-५६ ला श्री. सुरजमल सेठ यांच्या बगिच्यांत दसऱ्यांचा उत्सव करण्यांत आला. ह्या वेळीं श्री. कुळकर्णी वकील, श्री. दीक्षित मास्तर व श्री. वसंतराव देव यांचीं भाषणें झालीं.

दि. २०-१०-५६ ला भंडारा जिल्ह्याधीश श्री. आवळे यांना निरोप देण्याचा कार्यक्रम झाला.

गोंदिया येथील संमेलनाचा अहवाल अन्यत्र दिला आहे.

(६) खामगांवः—खामगांव शाखेने "कै. श्री. कृ. कोल्हटकर स्मारक मंदिर" उभारण्याचा संकल्प केला असून दि. ३१-३-५६ रोजीं मध्यप्रदेशाचे राज्यपाल डॉ. पट्टाभि सीतारामय्या यांचे हस्तें जागेच्या भूमिपूजनाचा समारंभ करण्यांत आला.

तसेंच तेथील 'जीवन विकासमंडळाच्या' वतीने कै. कोल्हटकर स्मारक मंदिराच्या मदतीकरितां शाखा कार्यवाह प्रा. पद्माकर डावरे यांनी लिहिलेल्या 'मृत्युंजय' ह्या नाटकाचा प्रयोग करण्यांत आला.

शाखा नियमः—ह्यावर्षी केंद्रीय कार्यकारी मंडळाने शाखाविषयक उपनियम तयार करून शाखांचें कार्य पद्धतशीर करण्यास मार्गदर्शन केलें आहे.

संमेलन वृत्तांत

विदर्भ साहित्य संघाचें १९ वे संमेलन गोंदिया येथील मनोहरभाई नगरपालिका विद्यालयाच्या प्रशस्त जागेंत दि. २७ व २८ जानेवारी ५७ रोजीं अत्यंत थाटांत पार पडलें.

संमेलनाकरितां प्रतिनिधि व स्वागतमंडळाचे सदस्य मिळून अदमासें ३०० लोक उपस्थित होते.

संमेलनांत पुढीलप्रमाणे कार्यक्रम झाले.

दि. २६-१-५७ रोजीं रात्रौ स्थानिक कलावंतांतर्फे 'माहेरघर' नाटक.

रविवार दि. २७-१-५७ ला सकाळीं ११ वा. केंद्रीय कार्यकारीमंडळाची सभा व दुपारीं २ वाजतां सर्वसाधारण सभेची बैठक.

दुपारीं २॥ वाजतां विषयनियामक समितीची सभा.

सायंकाळीं ५। वाजतां खुल्या अधिवेशनास सुरुवात झाली. स्वागताध्यक्ष छोटुसाभाई क्षत्रिय यांच्या अनुपस्थितीमुळे कार्याध्यक्ष श्री. ना. ह. तेलंग यांनी स्वागतपर भाषण केलें. त्यानंतर संमेलनाध्यक्षांची रीतसर निवड करण्यांत आली. हार समर्पणानंतर संमेलनाचें उद्घाटन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केलें. संदेशवाचनानंतर संमेलनाध्यक्ष श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांचें भाषण झालें.

रात्रौ ९॥ वाजतां सारस्वत मंडळ, नागपूर तर्फे 'उद्यांचा संसार' नाटक झालें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दि. २८-१-५७ ला सकाळीं ८॥ वाजतां भवभूतिविषयक परिसंवाद झाला. यांत म. म. वा. वि. मिराशी, प्रा. ग. त्र्यं. देशपांडे, प्रा. पां. कृ. सावळापूरकर, प्रा. श्री. भा. वर्णेकर, डॉ. त्रि. वा. करंवेळकर, व श्री. त्रि. रा. काटे यांनी भाग घेतला. हा परिसंवाद ग्रंथरूपाने प्रकाशित होणार आहे.

सकाळीं १०॥ वाजतां तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचें 'सृजनशील साहित्य व समाज' ह्या विषयावर व्याख्यान झालें.

दुपारीं १२ वाजतां संमेलनाकरिता जमलेले प्रतिनिधि, स्वागतसमितीचे सदस्य व गावांतील प्रतिष्ठित साहित्यप्रेमी नागरिक यांना मेजवानी देण्यांत आली.

दुपारीं ३ वाजतां प्रतिनिधि व स्वागतमंडळाचे कार्यकर्ते यांच्या परिचयाचा रोचक कार्यक्रम होऊन नंतर साहित्यचर्चा झाली.

सायंकाळीं ५॥ वाजतां खुलें अधिवेशन व समारोपाचा कार्यक्रम झाला. या अधिवेशनांत पुढील विषयांसंबंधीं एकूण १२ ठराव मांडण्यांत आले व ते एकमताने मंजूर करण्यांत आले. (१) दिवंगतांना श्रद्धांजलि अर्पण करण्यांत आली. (२) मुंबई सरकारने मध्यप्रदेशांतील साहित्यिकांना प्रोत्साहन द्यावें व मुंबई सरकारने शासनसाहित्य परिषद निर्माण करावी. (३) मराठी लेखनाची सर्वसामान्य प्रमाणित आणि अधिकृत पद्धति सरकारने तयार करावी. (४) मुंबई सरकारने ह्या राज्यासाठी स्वतंत्र पुराणवस्तुखातें उघडावें. (५) गॅझेटियर्स सुधारणेच्या योजनेंत मुंबई राज्यांत नवीन समाविष्ट झालेल्या जिल्ह्यांच्या गॅझेटियर्सचाहि समावेश व्हावा. (६) दुर्मिळ पुस्तकांचें पुनर्मुद्रण व्हावें. (७) कालिदास व भवभूति स्मारकें सरकारने उभारावींत. (८) पुराणलेख विभागाध्यक्षाची कचेरी उटकमंडहून नागपुरास आणण्यांत यावी. (९) वि. सा. संघाच्या साहित्य विनीत व सा. स्नातक परीक्षांस सरकारने व विद्यापीठाने मान्यता द्यावी. (१०) प्रकाशन हक्क (कॉपीराईट) व पुस्तकांचें भाषांतर करण्याचा हक्क याबाबत व धर्मार्थ नाट्यप्रयोगाबद्दल नाटककारास कांही देण्यांत येऊं नये, या संसदीय विधेयकाला विरोध करणारा ठराव. (११) मराठी भाषा बोलणारे जिल्हे मुंबई राज्याला जोडण्यांत यावेत. (१२) विदर्भांतील राज्यकारभार मराठींतूनच चालावा.

रात्रौ ९॥ वाजतां विविध मनोरंजनाचे कार्यक्रम व श्रीमती विनोदिनी दीक्षित यांचें गायन झालें. नागपूरचे श्री. कुळकर्णी यांच्या 'मेघा' काव्यसंग्रहाचें प्रकाशनहि याचवेळीं संघाध्यक्षांच्या हस्तें पार पडलें.

मध्यप्रदेश संशोधन मंडळ, शारदाश्रम यवतमाळ, समाजसेवा विभाग व विदर्भ साहित्यसंघ यांचे वतीने संमेलनांत ऐतिहासिक व साहित्यिक सामुग्रीचें प्रदर्शनहि भरविण्यांत आलें.

प्रस्तुत संमेलन यशस्वी करण्याकरितां श्रीमान मनोहरभाई पटेल, श्रीमान छोटुसाभाई क्षत्रिय, सर्वश्री. ना. ह. तेलंग, के. खं. कुलकर्णी, ना. ग. डबीर, छेदीलाल गुप्त, ग. गो. व्यवहारे, वि. अ. लिमये, वा. का. देशमुख, प्र. श. तनखीवाले, शेखदार इत्यादि असंख्य कार्यकर्त्यांचें, दात्यांचें व गोंदियावासी जनतेचें बहुमोल साहाय्य झालें, त्यासर्वांचा वि. सा. संघ ऋणी आहे. संमेलनाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, परिसंवादांतले वक्ते, नाटककर्ते, प्रकाशन विभाग, नागपूर नभोवाणी, गोंदिया नगरपालिका, मध्यप्रदेश संशोधन मंडळ, शारदाश्रम यवतमाळ, समाजसेवा विभाग, प्रतिनिधि व इतर असंख्य सहाय्यकर्ते यांचाहि वि. सा. संघ आभारी आहे. त्यांच्या सहकार्यामुळेच गोंदियाचें संमेलन सर्वच दृष्टींनी उत्कृष्ट झालें.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

देणगीदार

ह्यावर्षी वि. सा. संघाला पुढीलप्रमाणे देणग्या मिळाल्या.

टिळक-आगरकर महोत्सवाकरिता—

टिळक पर्स फंड, नागपूर व वऱ्हाड शाखा	रु.	२०००
श्री. य. गो. आगरकर, अकोला	रु.	२१
श्री. अनामिक	रु.	११

कै. गडकऱ्यांच्या प्रतिमेकरितां—

श्रीमती बकुलाबाई अभ्यंकर, पुणें	रु.	५००
श्री. बाळासाहेब आठवले	रु.	१०

रंगमंदिराकरितां

मुंबई मराठी साहित्य संघ ...	रु.	१०१
ऑल इंडिया लाईफ इन्शुअरन्स असोशिएशन, नागपूर	रु.	३०

उपाधिधारी शाल-समारंभाकरितां

श्री. अनामिक	रु.	५१
श्री. द. कृ. मोहनी	रु.	३०
श्री. पां. कृ. सावळापूरकर ...	रु.	५
पं. हृषीकेशजी शर्मा	रु.	५
प्रा. श्री. मा. कुळकर्णी	रु.	५
प्रा. माणिक के. बैतुले	रु.	१५
श्री. धाक्रस	रु.	१५

ह्याशिवाय रंगमंदिराकरिता रु. ३७००० च्या लहानमोठया देणग्या मिळाल्या आहेत. सर्व देणगीदारांचा वि. सा. संघ आभारी आहे.

शासकीय साहाय्य

ह्या वर्षी जुन्या मध्यप्रदेश शासनाने संघाच्या जागेस लागून असलेली पश्चिमेकडील ०·२५ एकर जमीन नझूलद्वारा वि. सा. संघास देऊन उपकृत केलें आहे.

ह्याशिवाय वार्षिक अनुदान रु. ७५०० व रंगमंदिराच्या बांधकामाकरिता अनुदान रु. ५०००० देण्यांत आलें आहे. वार्षिक अनुदानापैकी दुसरा हप्ता रु. ३७५० देऊन मुंबई शासनाने संघास उपकृत केलें आहे. वि. सा. संघाच्या कार्याची फार मोठी भिस्त शासकीय साहाय्यावर असल्यामुळे मुंबई राज्य व भारत शासन यांनी यापुढेहि वि. सा. संघाबद्दल साहाय्यक धोरण ठेवावें, अशी त्यांना नम्र विनंती आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आभार व प्रार्थना—या वर्षी वि. सा. संघाचें कार्य पार पाडण्यास शेकडों कार्यकर्त्यांचें, दात्यांचें, सभासदांचें व संस्थांचें साहाय्य झालें आहे. वि. सा. संघ त्यांचा अत्यंत ऋणी आहे. वि. सा. संघाचें कार्य यापुढे अधिक वाढविण्यासाठी सभासद, देणगीदार, शाखा व शासकीय साहाय्य वाढणें अत्यंत आवश्यक आहे. या दृष्टीने सर्व मराठी जनतेने वि. सा. संघास मदत करावी अशी प्रार्थना आहे.

नागपूर
दि. १४-४-५७

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस,
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

(१-४-५६ ते ३१-३-१९५७) ३१ मार्च

जमा		रु. आ. पै.
आरंभीची शिल्लक		
नगदी जवळ	४५-१३-६	
बँकेंत	१६,३८२-१०-०	
मुदतीची ठेव	५,५००—०-०	२१,९२८—७-६
वर्गणी		
साधारण सभासद	१,८३६ —०-०	
आजीव	९०२—०-०	२,७३८—०-०
परीक्षा शुल्क		८,६५४-१०-०
सांस्कृतिक समिति		१,३०५ —०-०
नाट्य समिति		६,३०१—०-०
गडकरी समिति		५२५—०-०
पाठ्य पुस्तक प्रतिलिपि अधिकार		१,०००—०-०
पुस्तक विक्री		९० —१-०
ठेवीवरील व्याज		२९९—३-३
सरकारी अनुदान		७,५००—०-०
किरकोळ उत्पन्न		३१५—२-०
युगवाणी वर्गणी		८०—०-०
मंदिर निधि देणग्या		३०,३१६—०-०
,, कर्ज		७,०००—०-०
डिपॉझिटस्		२,६००—०-०
,, सरकारी अनुदान		५०,०००—०-०
तैलचित्रासाठी देणगी		४६—०-०
इतर देणग्या		२,१६६—०-०
		१,४२,८६४—७-९

खर्च	रु. आ. पै.
वेतन	३,२००—५-३
फोन व पोस्टेज	५८६—७-९
मुद्रण व स्टेशनरी	४५७—८-९
युगवाणी मुद्रण खर्च	३,९७०—९-९
वाहन व प्रवास	१६७—७-०
किरकोळ खर्च	१६०-१०-०
सांस्कृतिक कार्यक्रम	२,२९७—३-३
टिळक आगरकर उत्सव	१,६९८-१३-०
आतिथ्य खर्च	२५१—७-०
वीज खर्च	३६०-१३-०
परीक्षा समिति	८,१२२—६-६
मोफत पुस्तक वाटणी	३३२—०-०
कार्यालयीन व्यवस्था	५४९-१२-९
बँक कमिशन	९-१४-०
वस्तु खरेदी	५—०-०
ग्रंथ संपादन	१६७—४-९
ऑडिट फीज	५०—०-०
अंशदान	८०—०-०
गडकरी स्मारक समिति	१००—५-३
नाट्य समिति	५२—३-३
मंदिर रचना	१,०२,६७१-११-९
ॲडव्हान्स टु स्टाफ	१०—०-०
सस्पेन्स अकौण्ट	३४—६-९
तैलचित्रासाठी	६५—०-०
गडकरी तैलचित्र	३००—०-०
	१,२५,७०१—५-९

नागपूर, दि. १४ एप्रिल १९५७

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

१९५७ रोजीं संपणाऱ्या वर्षाचा जमाखर्चाचा तक्ता

जमा	रु. आ. पै.	खर्च		रु. आ. पै.
	१,४२,८६४—७-९			१,२९,७०१—५-९
		बँक		
		म. प्र. हाऊसिंग	४,३१५-१०-६	
		„ „ को. ऑपरे.	३८१-११-९	
		महाराष्ट्र (करंट)	४,५८९—४-३	
		„ (बिल्डिंग)	१,५४२—७-०	१,०८२९—१-६
		मुदतीची ठेव		५,५००—०-०
		नाट्यसमितिजवळील शिल्लक		७००—०-०
		शिल्लक जवळ नगदी		१३४—०-६
	१,४२,८६४—७-९			१,४२,८६४—७-९

सर्वसाधारण सभेंत मंजूर
सही/-पुरु. दिवा. ढवळे
२१-४-५७

तपासलें व तें बरोबर आहे
सही/-महेश्वर गद्रे आणि कं.
चार्टर्ड अकाउंटंट

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

३१ मार्च १९५७ रोजीं असलेला ताळेबंद

फंड व लायबिलीटीज	रु. आ. पै	रु. आ. पै
आजीव सभासद		
मागील बाकी	४,८६४—०-०	
अधिक यंदाचे	९०२—०-०	५,७६६—०-०
मंदिर निधि		
बाकी मागील	६२,०२४-१२-०	
अधिक यंदाचे	३०,३१६—०-०	९२,३४०-१२-०
मंदिर सरकारी अनुदान		
बाकी मागील	३०,३३३—०-०	
अधिक यंदाचे	५०,०००—०-०	८०,३३३—०-०
मंदिर निधि कर्ज		७,०००—०-०
मंदिर निधि डिपॉझिटस्		२,६००—०-०
कै. नेने स्मारक फंड		
बाकी मागील		७५—०-०
तैलचित्रासाठी		
बाकी मागील	१७५—०-०	
अधिक यंदाचे	४६—०-०	
	२२१—०-०	
खर्च झाले	६५—०-०	१५६—०-०

असेटस् व प्रॉपर्टी	रु. आ. पै	रु. आ. पै
टिनशेड व विहीर		
मागील बाकी		५,३४१-१३-९
इलेक्ट्रिक डिपॉझिट		
मागील बाकी		३३१—०-०
फर्निचर व इतर सामान		
मागील बाकी	७,६१४—९-६	
अधिक यंदाचे	५—०-०	७६१९—९-६
मंदिर रचना		
मागील बाकी	९३,७५४-१४-३	
अधिक यंदाचे	१,०२,६७१-११-९	१,९६,४२६-१०-०
पुस्तकें		
मागील बाकी	४०—८-०	
अधिक यंदाचे	१६७—४-९	२०७-१२-९
ॲडव्हान्स टु स्टाफ		१०—०-०
कै. गडकरी तैलचित्र		३००—०-०
मुदतीची ठेव		५,५००—०-०

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सस्पेन्ट अकौंट		२०१–१०–०	बँकेंत		
जनरल फंड			म. प्र. हाऊसिंग	४,३१५–१०–६	
बाकी मागील	३१,६५६—८–३		,, ,, को. ऑपरे.	३८१–११–९	
अधिक यंदाचे	७,६२४—१–९	३९,२८०–१०–०	महाराष्ट्र करंट	४,५८९—४–३	
			,, बिल्डिंग	१,५४२—७–०	१,०८२९—१–६
			नाट्य समितीजवळील शिल्लक		७००—०–०
			गडकरी समितीजवळ ,,		३५३—०–६
			रोख शिल्लक जवळ		१३४—०–६
		२,२७,७५३—०–६			२,२७,७५३—०–६

प्रमाणपत्र—विदर्भ साहित्य संघ या संस्थेच्या ३१ मार्च १९५७ रोजीं तयार असलेल्या बॅलन्सशीटमध्ये वर दिलेले आकडे संघाच्या जमाखर्चाच्या पुस्तकांशीं तंतोतंत जुळतात आणि हीं पुस्तकें आम्ही तपासलीं असून तीं बरोबर आहेत असें प्रमाणपत्र आम्ही देतों.

नागपूर, दि. १४ एप्रिल १९५७

दि. २१–४–५७ च्या साधारण सभेंत मंजूर
सही/-पुरु. दिवा. ढवळे

सही/-महेश्वर गद्रे आणि कं०
चार्टर्ड अकौंटंटस

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

(१-४-५६ ते ३१-३-५७) ३१-३-५७ ला संपणाऱ्या वर्षाच्या आय-व्ययाचा तक्ता

आय

साधारण सभासद वर्गणी	१,८३६—०—०
परीक्षा शुल्क	८,६५४—१०—०
किरकोळ जमा	३१५——२—०
सरकारी अनुदान	७,५००—०—०
इतर देणग्या	२,१६६—०—०
नाट्य समिति	६,३०१—०—०
सांस्कृतिक समिति	१,३०५——०—०
गडकरी समिति	५२५——०—०
पाठ पुस्तक प्रतिलिपि अधिकार	१,०००——०—०
पुस्तक विक्री	९०—१—०
ठेवीवरील व्याज	२९९——३—३
युगवाणी वर्गणी	८०——०—०
	३०,०७२——०—३

व्यय

वेतन	३,२००——५—१
पोस्टेज व फोन	५८६——७—९
मुद्रण व स्टेशनरी	४५७—८—९
युगवाणी व मुद्रण	३,९७०——९—९
वाहन व प्रवास	१६७——७—०
किरकोळ खर्च	१६०—१०—०
सांस्कृतिक कार्यक्रम	२,२९७——३—३
टिळक व आगरकर उत्सव	१,६९८—१३—०
आतिथ्य खर्च	२५१—७—०
वीज खर्च	३६०—१३—०
परीक्षा समिति	८,१२२—६—६
मोफत पुस्तक वांटणी	३३२—०—०
कार्यालयीन व्यवस्था	५४९—१३—९
बँक कमिशन	९—१४—०
ऑडिट फीज	५०—०—०
अंशदान	८०—०—०
गडकरी स्मारक समिति	१००—५—३
नाट्य समिति	५२—३—३
	२२,४४७—१४—६
एक्सेस ऑफ इनकम ओव्हर एक्स्पेंडीचर cf. to B. /S.	७,६२४—१—९
	३०,०७२—०—३

नागपूर दि. १४ एप्रिल, १९५७

सर्वसाधारण सभेंत मंजूर झालें
सही/–पुरु. दिवा. ढवळे
२१-४-५७

तपासलें व तें बरोबर आहे
महेश्वर गद्रे आणि कं०
चार्टर्ड अकाउंटंटस्

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

Regd. No. N 945

ज[illegible]र विनंती

विदर्भ साहित्य संघाचें नवीन [illegible] १ [illegible] १९५७ पासून सुरू होत असून नवीन वर्षाकरिता सभासद-नोंदणी सुरू झाली आहे. वयाचीं २१ वर्षें पूर्ण झालेल्या कोणत्याहि मराठी-भाषाप्रेमी व्यक्तीला सभासद होतां येतें. नव्याने सभासद होणारांना आवेदनपत्र भरून द्यावें लागतें. साधारण सभासदाची वार्षिक वर्गणी फक्त रु. तीन [illegible] सभासदांना युगवाणीचे अंक विनामूल्य पाठविण्यांत येतात. सभासदांचे वर्ग पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) **उपकर्ते**—पांच हजार किंवा अधिक रुपये देणारे.

(आ) **आश्रयदाते** —एक हजार किंवा अधिक रुपये देणारे.

(इ) **सहाय्यक**—पांचशें किंवा अधिक रुपये देणारे.

(ई) **हितचिंतक** – अडीचशें किंवा अधिक रुपये देणारे.

(उ) **आजीव सभासद**—पन्नास किंवा अधिक रुपये देणारे.

(ऊ) **साधारण सभासद**—वार्षिक तीन रुपये देणारे.

वर्गणी येण्यास उशीर झाल्यास युगवाणीचे अंक नियमितपणें पाठविण्यांत गैरसोय होते. तरी गैरसोय टाळण्याकरिता नवीन सभासद होऊं इच्छिणारांनी व जुन्या सभासदांनी त्वरित वर्गणी पाठवावी पाठवावी अशी नम्र विनंती आहे. सभासदनोंदणीकरिता ज्यांचेजवळ अधिकृत पावतीपुस्तकें दिलीं आहेत त्या कार्यकर्त्यांनीं नांवें सोबत दिलीं आहेत. त्यांजवळ किंवा कार्यालयांत वर्गणी जमा करून पावती घ्यावी ही विनंती आहे.

दरवर्षी वि. सा. संघाचे सभासद वाढविणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांना व साहित्यप्रेमिकांना त्यांनी या वर्षीहि सभासदनोंदणीला मदत करावी अशी विनंती आहे. ज्या कार्यकर्त्यांना पावतीपुस्तकें हवीं असतील त्यांनी तशी कृपया मागणी करावी.

श्री. गो. काशीकर

सरचिटणीस, वि. सा. संघ, नागपूर

वि. सा. सं. चीं अधिकृत पावतीपुस्तकें ज्यांचेजवळ आहेत त्या कार्यकर्त्यांची यादी व पत्ते

अमरावती १ प्रा. मा. ल. व्यवहारे, खापर्डे बगीचा. २ श्री. कृ. व्यं. पेशकार, देवस्थळी यांचा बंगला, अंबापेठ. **हिंगणघाट :** श्री. रा. वि. [illegible]रपे, लक्ष्मी टॉकीजजवळ. **धामणगांव :** श्री. श्री. पुं. कटाळे. **चांदा** श्री. ज. गो. मंत, महात्मा कस्तुरबा मार्ग. **रामटेक :** श्री. कृ. पां गैराळ, श्रीराम विद्यालय. **भंडारा :** श्री. वि. बा. हावरे, जिल्हा ग्रंथपाल. **खामगांवजह्ल :** श्री. वि. भ. देशपांडे, वकील. **वर्धा :** श्री. म. ता. गजरा. **खामगांव :** श्री. वि. ए. तार, गो. से. महाविद्यालय. **गोंदिया :** श्री. बा. का. देशमुख, वकील, सिव्हीललाइन. **वर्धा :** श्री. र. वि. करंदीकर, वकील, महादेवपुरा. **पुसद :** १ श्री. दि. बा. जकाते. २ श्री. भा. श्री. केसकर. **यवतमाळ** श्री. दि. व. महाजन, वकील. **बुलढाणा :** श्री. मा. ग. डोंगरे, वकील. **वाशीम :** श्री. कृ. भ देशपांडे, वकील. **नागपूर :** १ श्री रा. पु. सगदेव, प्रभाविकास केंद्र रोड; २ श्री. ना. हि. सोनडुले, त्रिवेदी ब्रह्मोसमाज चाळ, उत्तर बझार रोड, ३ श्री. नानासाहेब जोग, गोखले हिल्स, कांग्रेस नगर; ४ श्री. श्री. ग पांढरीपांडे, धंतोली; ५ श्री. य. गो साळवे, नानजीभाई टाऊन, सीताबर्डी; ६ प्रा. श्री. गो. काशीकर, दुवेकरांचे घर, धरमपेठ; ७ श्री. पां. बा. [illegible], वॉकररोड, सर्कल क्र. ६; ८ श्री. तु. वि. गेडाम, महालपुरा, सीताबर्डी; ९ श्री. मनोहर [illegible], नागपूर.

मासिक श्री पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी वि. सा. संघाकरितां नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ